

# मोतीपुष्प

## वार्षिकांक
## २०२५-२६

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर द्वारा संचालित

❋ नॅक द्वारा चौथ्यांदा मानांकित ❋

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,

पिंजर ता.बार्शिटाकळी जि.अकोला

# ✻ आमचे प्रेरणास्थान ✻



जन्म २२ जून १९२२-मृत्यू ११ मार्च २००५

"तुमचे हाती सुवर्णाचे, मिळाले मोल मातीला
हिऱ्याचे तेज ही तैसे चढले गार गोटीला
दिसली पावला खाली, खड्यांना तारका कांती
विषारी तिक्ष्ण काट्यांची, तुमच्या स्पर्शे फुले झाली."

*स्व. मोतीरामजी उदेभानजी उपाख्य भाऊसाहेब लहाने*

संस्थापक अध्यक्ष
सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर



अभिप्रेरण (दिक्षारंभ) कार्यक्रमात नवीन शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन करतांना डॉ. पंकज तायडे.
**दि.२२/०७/२०२५**

MPSC, UPSC,Bank Exam, स्पर्धा परीक्षा संबंधी मार्गदर्शन करतांना समाजशास्त्र विभागाचे प्रा. प्रकाश एस.भगत.





मा. भाऊसाहेब लहाने पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी.



भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस्
कॉलेज, पिंजर मध्ये पर्यावरण
दिनानिमित्त महाविद्यालयाचे
मुख्य लिपिक
देवानंद बाकल साहेब
वृक्षारोपण करतांना.




राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये
डॉ. ए. व्ही. वाहूरवाघ
मार्गदर्शन करताना.




'भारतीय अधिकोषण पद्धती'
या विषयावरील एक दिवसीय
कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना
श्री आकाश मौर्य सहायक शाखा प्रबंधक,
सेंट्रल बँक पिंजर **(७.४.२०२६)**




अनुलोम संस्थेचे सेवक
सिद्धेश्वर खोबरे
आणि महाविद्यालयाचे
प्राचार्य, प्राध्यापक.




पोहरादेवी येथे
अभ्यास दौऱ्यामध्ये
सहभागी विद्यार्थी आणि
प्राध्यापकांचे क्षणचित्र.



अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी असलेले
विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे नंगारा
भवनाच्या प्रवेशद्वारावरील छायाचित्र.




अकोला येथील समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात संविधानाची उद्देश पत्रिका भेट देताना डॉ. वासुदेव भगत.

पदवी वितरण आणि बक्षीस वितरण समारंभामध्ये मार्गदर्शन करताना मा. गंगाधर दराडे साहेब






ग्रंथालय विभागाद्वारे आयोजित फॅन्सी ड्रेस स्पर्धेमधील सहभागी विद्यार्थी




मराठी विभागात आचार्य पदवी
प्राप्त करणाऱ्या
विद्यार्थ्यांची मुलाखत घेतांना
मान्यवर.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त
मार्गदर्शन करतांना ग्रंथपाल
डॉ. रेखाताई काळबांडे.






शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री
सहाय्यता निधीत
रु. 21000 चा धनादेश
महाविद्यालयाचे वतीने अकोला
जि.कलेक्टर यांना देतांना
डॉ. नानासाहेब सपकाळ.




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन.

विद्यार्थ्यांना पदवी वितरण करतांना पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा.गंगाधर दराडे साहेब.






पदवी वितरण आणि बक्षीस समारंभातील सामुहिक क्षणचित्र.




संविधान दिनानिमित्त
मार्गदर्शन
करतांना डॉ. पंकज तायडे



संविधान उद्देश पत्रिकेचे सामुदायिक
वाचन करतांना प्राचार्य,
प्राध्यापक आणि विद्यार्थी.




श्री संत गजानन महाराज
महाविद्यालय, बोरगांव मंजु
येथे नवीन शैक्षणिक धोरणातील
मुलभूत बदल या विषयावर
मार्गदर्शन करतांना
डॉ. पंकज तायडे.
दि. १८/०९/२०२५




पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या स्मरणार्थ व्याख्यानात प्रमुख मार्गदर्शक मा. महेंद्र कविश्वर साहेब.

स्व. भाऊसाहेब लहाने २१ वे पुण्यस्मृती दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते सत्कार स्वीकारतांना प्राचार्य, प्राध्यापक तसेच कर्मचारी.





6 फेब्रुवारी 2026 ला राज्यशास्त्र व इंग्रजी विभागाद्वारे नंगारा भवन, पोहरादेवी येथे अभ्यास दौरा.




संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान जनजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सिद्धेश्वर खोबरे.




सत्र २०२५-२६ युवक महोत्सवात महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व करतांना कु.तृप्ती भेंडकर.




दिक्षारंभ कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. व्ही.सी.खारोडे.

# संपादकीय

आमच्या उपरोक्त कला महाविद्यालयाचा हा विसावा वार्षिकांक आपल्या हाती सोपवितांना कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. 'मोतीपुष्प' या विशेष नामाने तो दरवर्षी आम्ही प्रकाशित करित असतो.

स्व.भाऊसाहेब लहाने यांच्या दृष्टीसमोर वरिष्ठ महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास करुन दर्जेदार उच्च शिक्षणाची सोय पिंजरमध्येच व्हावी हे स्वप्न होते. आमच्या सुदैवाने त्यांच्या डोळ्यासमोरच हे स्वप्न पुर्ण झाले. काळ अनंत आहे. काळाच्या ओघात महाविद्यालयाच्या स्थापनेला सत्ताविस वर्षे उलटून गेलीत. या सत्ताविस वर्षात अनेक स्थित्यंतरे झालीत. इंटरनेटमुळे आजच्या जगाला खुपच गतीमान केले आहे. दूरशिक्षणाद्वारे अध्यापनाची गती विस्मयकारक वाढली आहे.

दरम्यान महाविद्यालयातील आम्हा सर्व प्राध्यापकांच्या हातून हजारो विद्यार्थी–विद्यार्थीनी पदवी प्राप्त करुन विविध क्षेत्रात कार्यरत झालीत. मागे वळून पाहतांना मनात विचार येतो की,या हजारो विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी अर्थार्जनासह त्यांच्या जीवनात स्थिरावलीत. त्याचा निष्कर्ष असा निघतो की, काही शेकडो विद्यार्थी त्यांच्या कुटूंबातील पारंपारिक शेती व पुरक व्यवसाय सांभाळीत आहेत. काही विद्यार्थ्यांनी अन्य व्यवसाय निवडले व ते समाजात स्थिरपणे उभे राहीलेत. काही विद्यार्थ्यांनी शिक्षण घेता घेता बलोपासनेवर भर दिला, परिणामी हे विद्यार्थी पोलीस खाते व सैन्यात विविध हुद्यांवर कर्तव्य बजावित आहेत. तर पदव्युत्तर शिक्षण घेवून काही विद्यार्थी व विद्यार्थीनी बँकेत व पोष्टात रुजू झालेत. ही आमच्या महाविद्यालयाची जमेची बाजू आहे. उर्वरित विद्यार्थी या देशाचे आदर्श नागरिक आहेत. कारण शिक्षणाने त्यांच्यात विवेकीपणा व आदर्श मूल्यांचे संवर्धन करण्याचे कार्य आम्ही केले आहे. शिक्षणाने आलेला विवेकीपणा व उपजत बुद्धीकौशल्यांच्या जोरावर महाविद्यालयाचे निवडक विद्यार्थी समाजासमोर उत्तम वक्ते या बिरुदाने वावरत आहेत. याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो.

'मोतीपुष्प' या वार्षिक अंकाची कल्पना, त्याचे नियोजन व मांडणी तसेच अंतर्गत सजावट व काही नवे उपक्रम याचे संपूर्ण श्रेय आमचे सन्माननीय प्राचार्य डॉ.व्ही.सी.खारोडे सर यांनाच जाते प्राचार्यांच्या मनात सतत महाविद्यालयाच्या उत्कर्षाचा ध्यास असतो. या ध्यासाचे फळ म्हणजे हा या वर्षी प्रकाशित होणारा अंक होय. आम्ही निमित्तमात्र आहोत.

महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांनी, कार्यालयाने वेळेत सर्व माहिती उपलब्ध करुन दिली,त्यांचे मी आभार मानतो.विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या अंकासाठी सर्जनशील साहित्य पूरवून खारीचा वाटा उचलला आहे.

संपादक मंडळ :– **डॉ.आर.एन.गावंडे** **डॉ. वासुदेव भगत** **डॉ.एम.के. फडणीस**
**महेश भेंडकर,** बी.ए.भाग ३ **कु.आयुषी हटकर,**बी.ए.भाग ३

प्रकाशक :– सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर ता.बार्शिटाकळी जि.अकोला

# प्राचार्यांचे मनोगत

आमच्या भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेजचा हा २०२५–२६ चा विसावा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. आमचे महाविद्यालय ग्रामिण जनजीवनाशी नाते सांगणारे आहे. संचालक मंडळ, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी वृंद, विद्यार्थी व भोवतालचे वातावरण हे ग्रामीण मातीशी इमान राखणारे आहे. ग्रामीण भागात गुणवत्तापुर्ण उच्च शिक्षण देतांना काही मर्यादा येतात. मर्यादांवर मात करण्याचा प्रयत्न आमच्यातील सर्व घटक मनापासून करित असतात. स्व.भाऊसाहेबांच्या पुण्यमय कृपा आशिर्वादाचे बळ आमच्या पाठीशी सदैव असतेच. त्यांच्याच आशीर्वादामुळे 'विद्यार्थी' हा केंद्रबिंदू मानून आमची शैक्षणिक वाटचाल चालू आहे. १९९५ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाने नॅक बंगलोर द्वारा पहीली चाचणी स्व.भाऊसाहेबांच्या कृतिशील मार्गदर्शनाखाली उत्तमरित्या पार पाडली. २०१२ मध्ये नॅक समितीने पुन्हा आमच्या महाविद्यालयाचे परिक्षण केले. त्यावेळेस महाविद्यालयाला १९१ गुण प्राप्त झाले होते. 'सी' हा ग्रेड प्राप्त केल्यावर आम्ही पुनश्च कामाला लागलो.

सप्टेंबर २०१७ मध्ये आमच्या महाविद्यालयाला नॅक समितीने तिसऱ्या सायकलसाठी भेट दिली. सदर समितीचे अध्यक्ष गुजरातचे डॉ.मोहिते सर होते. समन्वयक हिमाचल प्रदेशच्या डॉ.रैन मॅडम होत्या. नॅक पिअर टीमचे सदस्य उत्तर प्रदेशातील डॉ. शगुन आनंद सर होते. समीतीने आमच्या ग्रामिण भागातील महाविद्यालयाचे कौतुक केले. त्यांनी योग्य गुणांकन करुन २.११ गुणांसह आम्हाला 'बी' ग्रेड बहाल केला.

आमचे महाविद्यालय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत ग्रामीण भागातून चौथ्या सायकलसाठी पुढे आलेले एकमेव महाविद्यालय आहे. ग्रामीण भागात गुणवत्ता टिकवितांना अनेक अडचणी येतात. प्राप्त परिस्थितीत गुणवत्ता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करतो. भविष्यात या महाविद्यालयातील विद्यार्थी देशाचा उत्तम नागरिक बनावा हे आमचे उद्दिष्ट आहे. या कामी मला सर्वांच्या सहकार्यांची आवश्यकता आहे. मला हे सहकार्य मिळेल ही खात्रीही आहे.

२०१७–२०१८ या सत्रापासून विद्यापीठाने कला शाखेमध्ये सेमिस्टर पद्धतीचा अवलंब केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही पद्धती अत्यंत जटील असून त्याचे विपरित परिणाम दिसून येत आहेत, तसेच चांगले परिणामही दिसत आहेत. जसे की, मार्च–एप्रिल महिन्यातही विद्यार्थी खासकरुन सजग विद्यार्थीनी महाविद्यालयात तासिकांसाठी उपस्थित असतात. ही खूप मोठी जमेची बाजू आहे. संपूर्ण मे महिन्यात परीक्षा संपन्न होतील. ही सुद्धा आनंदाची बाब आहे. मी सेमिस्टर पद्धतीच्या यशस्वीतेसाठी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

महाविद्यालयाचा हिरवागार व नयनरम्य परिसर, खेळाचे मोठे मैदान, रनिंग ट्रॅक, परिपूर्ण इमारत, सुसज्ज ग्रंथालय, व्यायामशाळा, संगणकीकृत कार्यालय, अनुभवी व ज्ञानसंपन्न शिक्षकवर्ग ज्ञानप्रकाश कौशल्य विकास केंद्राद्वारा विद्यार्थ्यांना संगणक शिकण्याची अद्ययावत सुविधा, इंग्रजी संभाषणाचे धडे देणारे वर्ग व विविध सांस्कृतिक आणि क्रिडा स्पर्धेचे आयोजन व उत्तेजन या आमच्या जमेच्या बाजू आहेत. परिसरात विशाल वृक्ष उभारण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. त्यासाठी आम्रवृक्ष, नीमवृक्ष, पिंपळवृक्ष, गुलमोहर व अशोकांच्या झाडांची लागवड आम्ही केली आहे. झाडांना पाणी उपलब्ध व्हावे म्हणून वेस्ट वॉटर मॅनेजमेंट, रेन वॉटर हार्वेस्टींग, नवीन बोअरची उभारणी,ठिबक सिंचन पद्धती आदीचा अवलंब आम्ही करतो. या प्रयत्नातून पर्यावरणास हातभार लावण्याचे सत्कर्म आम्ही करतो याचा आनंद वाटतो. 'हिरवागार व स्वच्छ परिसर व विद्यार्थ्यांचे उत्साहाचे झरे' हे आमचे शैक्षणिक ब्रीद आहे. सोबतच महाविद्यालयास अधिक समाजाभिमुख करणे हे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी मला आपल्या सर्वांचे सहकार्य हवे आहे. आपण सहकार्य कराल ही आशा आहेच.

महाविद्यालयात एखाद्या विषयात विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सुविधा असावी असा महाविद्यालयाचा मानस आहे. उद्देश हाच की, ग्रामीण भागातील गरीब, होतकरु विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात जावू शकत नाही. त्यामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. अशा गरजू विद्यार्थ्यांसाठी एम.ए.पर्यंत शिक्षण सुविधा महाविद्यालयातच देण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करु. तसेच महाविद्यालयासाठी अत्यंत गौरवाची बाब म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयात संशोधन करता यावे म्हणून महाविद्यालयाने 'अर्थशास्त्र विषय संशोधन केंद्र' सुद्धा मिळवले आहे.

सन २०२४-२५ पासून बी.ए.प्रथमला नविन शैक्षणिक धोरणानुसार प्रवेश करावयाचे आहेत. ही बाब कठिण असली तरी शासनाच्या धोरणाचा एक भाग म्हणून हे काम आम्ही प्रभावीपणे करु व विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करु महाविद्यालयाच्या बाबतीत अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे महाविद्यालयाने सत्र २०२३-२४ मध्ये नॅकचे चौथे सायकल पूर्ण केले असून महाविद्यालयाला 'बी ग्रेड' (२.०७) मिळाला आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठाच्या ग्रामिण भागातील महाविद्यालयामध्ये नॅक चौथे सायकल पूर्ण करणारे हे एकमेव महाविद्यालय आहे आणि हे केवळ भाऊसाहेबांचा महाविद्यालयाला असलेला आशिर्वाद ह्यामुळेच शक्य झाले आहे.

**NEP** (एनईपी) नुसार अभ्यासक्रमाचे आता सत्र २०२६-२७ मध्ये तिसरे वर्ष येणार आहे. त्याचे नियोजन विद्यापिठाने दिलेल्या सुचनेनुसार आपल्या महाविद्यालयातील एनईपी सेल करत आहे. सत्र

२०२५-२६ मधील अजून एक गौरवाची बाब आमच्या महाविद्यालयाने मराठी विषयात देखिल पिएच.डी.संधोशन केंद्र मिळविले आहे. ग्रामिण भागातील महाविद्यालयात एनईपीच्या धोरणानुसार दोन विषयात संधोशन केंद्र प्राप्त असल्यामुळे ग्रामिण भागातील विद्यार्थी मराठी व अर्थशास्त्र या विषयात पुढील शिक्षण घेवून पिएच.डी. करु शकतात. तसेच नविन शैक्षणिक धोरणानुसार नैसर्गिक पद्धतीने महाविद्यालयात मराठी व अर्थशास्त्र विषयात बी.ए.ऑनर्स व संशोधनासाठी विद्यार्थी पुढील प्रवेशासाठी पात्र होतात. ही बाब ग्रामिण महाविद्यालयाच्या दृष्टीने समाधानकारक आहे.

डॉ.व्ही.सी.खारोडे

प्राचार्य

भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस्
कॉलेज, पिंजर जि. अकोला (महा.)

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख/कविता | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | ए.आय. आणि सायबर सुरक्षा | प्राचार्य डॉ.व्ही.सी.खारोडे | १ |
| २ | पैशाचे मानसशास्त्र-ग्रंथ परीक्षण. | डॉ.पंकज मा.तायडे | ५ |
| ३ | भारतीय संविधानाच्या जडणघडणीत डॉ. पंजाबराव देशमुख यांचे योगदान | डॉ. वासुदेव वा.भगत | १२ |
| ४ | Swami Vivekanand's Thoughts on Meditation | डॉ.रामकृष्ण ना.गावंडे | १९ |
| ५ | ए.आय. आणि ग्रंथालय ज्ञान विश्वाची नवी दिशा | डॉ. रेखा सु.काळबांडे | २५ |
| ६ | संत तुकारामांच्या परिप्रक्ष्यातील सामाजिक समता | डॉ.अशोक वि.वाहुरवाघ | २८ |
| ७ | तुका झालासे कळस | डॉ.एम.के. फडणीस | ३२ |
| ८ | स्मरणशक्ती वाढवण्यासाठी योगसाधनेचे महत्व | डॉ. नानासाहेब सपकाळ | ३९ |
| ९ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विद्यार्थ्यांना शैक्षणिक सल्ला | प्रा. सुनिल म. मनवर | ४३ |
| १० | ग्रामीण भागातील आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शैक्षणिक प्रगती | प्रा. प्रकाश एस. भगत | ५१ |
| ११ | शिदोरी | स्व. भा. भ. महल्ले | ५४ |
| १२ | वडिल : न बोलणारा हिरा | कु. सायली तायडे | ५५ |
| १३ | चारोळी | कु. स्विटी सुनिल घनगाव | ५६ |
| १४ | चारोळी | कु. स्विटी सुनिल घनगाव | ५७ |
| १५ | बापाची ती एक शिकवण | कु. प्राची इंगळे | ५८ |
| १६ | वडिलांच्या मनातील भावना...! | कु. अश्विनी चिकटे | ५९ |
| १७ | मी एकटी | कु. आयुषी हटकर | ६० |
| १८ | आई... शब्दात न मावणारी | कु. संचिता ढवळे | ६१ |
| १९ | बाप | कु. राजश्री सुनिल घनगांव | ६२ |
| २० | माझ गाव माझी जबाबदारी | महेश सं. भेंडकर | ६३ |
| २१ | मैत्री तु आणि मी | स्नेहा सुरेश भारस्कर | ६४ |
| २२ | अभ्यास दौरा अहवाल | कु. प्राची इंगळे | ६५ |
| २३ | महाविद्यालयातील कमिट्यांचा कार्यभार | | ६७ |
| २४ | Annual Planning-2025-26 | | ७० |
| २५ | Annual Planning-2026-27 | | ७३ |
| २६ | जातीनिहाय विद्यार्थ्यांचे विवरण सत्र २०२४-२५ | | ७६ |
| २७ | जातीनिहाय विद्यार्थ्यांचे विवरण सत्र २०२५-२६ | | ७७ |
| २८ | महाविद्यालयातील उपक्रमांची क्षणचित्रे २०२५-२६ | | |

# ए आय आणि सायबर सुरक्षा

प्राचार्य डॉ. व्हि.सी.खारोडे

अॅलन ट्युरिंग यांनी १९५० मध्ये आपल्या प्रसिद्ध संशोधन पर प्रबंधात कॉम्प्युटिंग मशिनरी अँड इंटेलिजन्स हा विषय सविस्तरपणे मांडला होता. यात त्यांनी एक साधा पण गहन प्रश्न उपस्थित केला होता. आणि तो म्हणजे यंत्रे विचार करु शकतात का ? हे तपासण्यासाठी त्यांनी एका चाचणीचा प्रस्ताव मांडला होता. ज्याला ट्युरिंग टेस्ट म्हणून ओळखले जाते. एखादे यंत्र अगदी मानवाप्रमाणेच नैसर्गिकरित्या सारखाच संवाद साधू शकते का? की व्यक्ती त्यांच्यात व मानवात काहीही फरक करु शकणार नाही, हाच या चाचणीचा उद्देश होता. काही वर्षानंतर १९५६ मध्ये डार्ट माउंथ कॉलेजमध्ये आयोजित एका संशोधन परिषद दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता हा शब्द औपचारिकपणे सादर करण्यात आला जो विचार कधी एकीकडे तात्विक वादविवाद किंवा चर्चा म्हणून पुढे आला होता. तो हळूहळू आज आधुनिक काळातील सर्वात शक्तीशाली तांत्रिक क्रांतीपैकी एक बनला. कृत्रिम बुद्धिमत्ता हा अगदी अलीकडील विकास आहे असे कदाचित आपल्याला वाटेल. परंतु याची मुळे दशकापूर्वीच आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

ए आय चा देखील एक राष्टीय पैलू आहे. ए आय संशोधन आणि त्याच्या वापरामध्ये देशा देशात तीव्र स्पर्धा आहे हे आहे संचालित निग्रणी अर्थात पाठ ठेवणे स्वायत्त प्रणाली आणि सायबर युद्ध क्षमता राष्ट्रीय सुरक्षा धोरणांना आकार देत आहेत. जनरेटिव्ह एआय द्वारे चालविल्या जाणाऱ्या संभ्रमित चुकांच्या माहितीच्या मोहिमा मोठ्या प्रमाणात जनमतावर प्रभाव टाकू शकतात. डिजिटल युद्धभूमीत आता केवळ सैनिकच नाही तर अल्गोरिदम आणि नरेटीव देखील समाविष्ट आहेत. म्हणूनच नैतिकता हा एक मोठा मध्यवर्ती मुद्दा बनतो जर कुठली ए आय प्रणाली पक्षपाती डेटामुळे एखाद्याला चुकीच्या पद्धतीने कर्ज नकारात असेल, तर याची जबाबदारी कोण घेणार ? जर चेहऱ्याची ओळख एखाद्याची चुकीची ओळख प्रतुत करीत असेल, तर त्या चुकीसाठी कोणाला जबाबदार धरले जाईल ? ए आय सिस्टम डेटामधून शिकतात जर डेटा मध्ये पक्षपात पूर्वग्रह ह्या गोष्टी अस्तित्वात असतील, तर त्याचे परिणाम आणखी वाढू शकतात. म्हणूनच ए आय या ऑपरेशनमध्ये पारदर्शकता, स्पष्टीकरण आणि जबाबदारी अतिशय महत्वपूर्ण आहे. आपण या प्रणालीकडे रहस्यमय गूड ब्लॅक बॉक्स म्हणून पाहु शकत नाही.

रोजगाराचा प्रश्न देखील प्रामाणिकपणे विचारात घेण्यासारखा आहे. ए आय केवळ एका रात्रीत नोकऱ्या संपुष्ठात आणणार नाही तर ते त्याचे रुपांतर करेल पुनरावृत्ती होणारी मानिसक कामे कमी होऊ शकतात, तर सर्जनशीलता, सृजनशीलता, सहानुभूती आणि नैतिक निर्णय आवश्यक असलेल्या कामांना महत्व मिळू शकते. भविष्यातील कार्य शक्तीला अर्थात कर्मचाऱ्यांना एआय शी स्पर्धा करण्याऐवजी त्याला सहकार्य करणे शिकावे लागेल. अनुकूल क्षमता अर्थात अनुकूलता आणि सातत्याने शिकण्याची क्षमता हेच व्यावसायिक यशाचे वैशिष्टय असेल. या वातावरणात एआय साक्षरता हे एक मूलभूत जीवन कौशल्य बनले पाहिजे. लोकांना केवळ ए आय उपकरणे साधने वापरण्याची गरज नाही, तर त्याच्या मर्यादा समजून घेण्याची देखील आवश्यकता आहे. स्वयंचलीत निकालावर प्रश्न विचारणे आणि त्यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. अल्गोरिदम निर्णयावर आंधळा विश्वास ठेवणे धोकादायक ठरु शकते.

आता सुरक्षितता या मुद्यावर लक्ष केंद्रीत करुन प्रत्येक डीव्हायीस मध्ये विश्वसनीय सुरक्षा सॉफ्टवेअर स्थापित केली पाहिजे आणि ते नियमितपणे अपडेट केले पाहिजे. महत्वाच्या खात्यासाठी दोन टप्यांचे प्रमाणीकरण सक्षम केले पाहिजे. ऑपरेटिंग सिस्टीम आणि अप्लिकेशन वेळेवर अपडेट केले पाहिजेत, कारण अपडेट्स बहुदा कमकुवतपणा दूर करतात, मात्र सार्वजनिक वायफाय नेटवर्क अतिशय सावधगीरीने वापरले पाहिजे. विशेषता आर्थिक व्यवहारासाठी वापरत असाल तर अधिकच काळजी घेतली पाहिजे. वेगवेगळ्या सेवांसाठी मजबूत आणि अव्दितीय पासवर्ड ठेवले पाहिजेत. भारतातील नागरिकांसाठी अनेक अधिकृत सुरक्षा यंत्रणा उपलब्ध आहेत. राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन १९३० आर्थिक फसवणुक या प्रकरणांमध्ये त्वरीत मदत प्रदान करते. जर सायबर पोलिसांना त्वरित कळले तर रोख देणे घेण्याचे व्यवहार रोखण्यासाठी सायबर सुरक्षा यंत्रणा मदत करु शकते. नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल पीडितांना ऑनलाईन तक्रारी दाखल करण्यास अनुमती देते. चक्षु सुविधा संशयास्पद संप्रेषणची तक्रार करण्यास मदत करते. संचार सारथी पोर्टल व्यक्तींना त्याच्या आधारशी जोडलेला मोबाईल नंबर तपासणीची आणि हरवलेल्या किंवा चोरीला गेलेल्या फोनचा आय एम ई आय नंबर निष्क्रीय करुन ब्लॉक करण्याची सुविधा देते.

डेटा उल्लंघन हा देखील एक मोठा चिंतेचा विषय आहे. जगातील मोठ्या संस्थांना देखील वापरकर्त्यांचा रेकॉर्ड त्याचा डाटा गोपनीय ठेवण्यात अपयश आले आहे. असंख्य वापरकर्त्यांनी याचा अनुभव घेतला आहे. मोठमोठ्या कंपन्यांकडून ग्राहकांचा डाटा लिक झाल्याच्या बातम्या आपण

वर्तमान पत्रात बऱ्याचदा वाचत असतो. आपला ई-मेल ॲड्रेस उल्लंघनात सामील आहे का, हे व्यक्तींनी वेळोवेळी तपासले पाहिजे. यासाठी बी आर इ एसी एच नोटिफिकेशन सर्विसचा वापर केला जाऊ शकतो. तर कुठले उल्लंघन आढळले तर पासवर्ड ताबडतोब बदलला पाहिजे आणि शक्य असल्यास मल्टीफॅक्टर ऑथेंटीकेशन सक्षम केले पाहिजे. रंजक बाब म्हणजे ए आय सुरक्षेला देखील एक भाग आहे. सेकंदात असामान्य व्यवहार रोखण्यासाठी बँका ए आय चा वापर करतात. असामान्य नेटवर्क क्रियाकल्पांची निरीक्षण करण्यासाठी सायबर सुरक्षा कंपन्या मशीन लर्निंग सिस्टीमचा वापर करतात. सरकारी समन्वित सायबर हल्ले ओळखण्यासाठी ए आय चा वापर करतात. याचा अर्थ असा की, हल्लेखोरांना सक्षम करणारे तेच तंत्रज्ञान बचावकर्त्यांना देखील बळकटी देऊ शकते.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ए आय काही जादू नाही, ते असाधारण प्रमाणात कार्य करणारी गणित आणि डेटा आहे. जेव्हा तुमचा मेंदू एखाद्या नवीन कुत्र्याला ओळखतो तेव्हा तो मेमरीमधील नमुन्याची तुलना करुन जटील मानसिक प्रक्रिया करतो. त्याचप्रमाणे जेव्हा एआय सिस्टम प्रतिमा ओळखते तेव्हा, ती शिकलेल्या पॅरामीटर्स मध्ये पॅटर्न जुळवते. यात फरक असा आहे की मानवामध्ये संदर्भ, भावना आणि नैतिक निर्णय असतात तर मशीनमध्ये या गोष्टी नसतात.

आम्ही अशा काळात राहत आहोत, जेव्हा तंत्रज्ञान जनतेच्या जागृतीमुळे वेगाने विकिसत होत. ए आय ची भीती बाळगणे हे आव्हान नाही तर ते समजून घेणे आणि जबाबदारीने वापरणे हेच खरे आव्हान आहे. जसजसे आम्ही २०२६ आणि यानंतर पुढे जाऊ तसतसे ए आय आणि सायबर सुरक्षेचा संगम आमची व्यक्तिगत सुरक्षा आमची अर्थव्यवस्था आणि राष्ट्रीय स्थिरता घडवेल. स्मार्ट मशीनचे आगमन अपरिहार्य आहे. मात्र आपण हुशार जाणकार डिजिटल नागरिक बनू का ? हाच खरा प्रश्न आहे.

**ए आय वापरासाठी नियम :**

भारत सरकारने ए आय चा सुरक्षित नैतिक आणि जबाबदार वापरुन निश्चित करयासाठी नवीन नियम लागू केले आहेत या नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईची तरतूद देखील करण्यात आली आहे.

१) ए आय किंवा संगणका द्वारे सुधारणा करुन निर्माण केलेले कंटेंट सिंथेटिकली जनरेट कंटेंट मानले जाईल, असे कोणतेही कंटेंट जे प्रत्यक्ष व्यक्ती घटना किंवा ठिकाणासारखे दिसणारे ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्म किंवा इंटरनेटवर शेअर करयापूर्वी त्यावर ए आय जनरेटेड वॉटर मार्किंग किंवा लेबलिंग आवश्यक आहे.

२) एकदा लेवल लावल्यानंतर ते काढता येत नाही. पूर्वी लोक ए आय जनरेटेड फोटोचे कोपरे कापून एडिटिंग करुन त्यांचे वॉटर मार्क काढून टाकत असत मात्र आता असे करणे बेकायदेशीर ठरेल.

३) युजर्स अर्थात वापरकर्त्यांनी अपलोड केलेल्या तथ्यांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक साधने विकसित करण्याची निर्देश सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला देण्यात आले आहेत. याचा अर्थ असा की पडताळणी केल्याशिवाय असे कंटेंट सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अपलोड करता येणार नाही.

४) वापरकर्त्यांनी ए आय चा गैरवापर केल्यास त्याला दंड किंवा शिक्षा होऊ शकते असा इशारा दर तीन महिन्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

५) दिशाभूल करणारे संभ्रम उत्पन्न करणारे कंटेंट काढून टाका असा आदेश जर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला देण्यात आला तर त्यांना तो तीन तासाच्या आत काढून टाकावा लागेल, पूर्वी ही अंतिम मुदत ३६ तास होती या व्यतिरिक्त सोशल मीडिया प्लॅटफॉर्म कोणी तयार केला हे त्वरित ओळखण्यासाठी कोडींग वापरण्यास सांगण्यात आले आहे.

६) मुलांशी संबंधित हिंसक आणि अश्लिल व्हिडीओवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, तसेच प्रतिसाद देण्याची वेळ बारा तासापर्यंत कमी करण्यात आली आहे.

संदर्भ सूची :- १) दैनिक तरुण भारत २) दैनिक लोकमत ३) दैनिक दिव्य मराठी

# 'पैशाचे मानसशास्त्र-ग्रंथ परीक्षण'

डॉ.पंकज तायडे,
(प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग)

**प्रस्तावना**

पैशाचे खरे मूल्य चैनीच्या वस्तू खरेदी करण्यात नसून, आपल्या वेळेवर आणि आयुष्यावर नियंत्रण मिळविण्यात आहे. हीच खरी स्वातंत्र्याची सर्वोच्च पातळी आहे. **मोर्गन हौसेल** यांच्या मते, पैशांशी संबंवित यश हे फक्त गणित, आकडे किंवा बुद्धिमत्तेवर अवलंबून नसते तर ते आपल्या वर्तन, सवयी आणि मानसिकतेवर अवलंबून असते. **'पैशाचे मानसशास्त्र'** म्हणजे आपण पैशांबद्दल कसे विचार करतो, निर्णय कसे घेतो आणि त्या निर्णयांचा आपल्या आयुष्यावर कसा परिणाम होतो याचा अभ्यास होय. **मोर्गन हौसेल** लिखित **'पैशाचे मानसशास्त्र'** या विक्रमी विक्रीस पात्र ठरलेल्या पुस्तकाचा सारांश याठिकाणी देत आहे. **'पैशांचे मानसशास्त्र'** म्हणजे पैशांच्या संदर्भातील आपल्या वर्तनाचा अभ्यास होय. लेखक व्यक्त होतांना म्हणतात की, पैशाच्या बाबतीतले यश हे ज्ञान, बुद्ध्यांक किंवा गणिती कौशल्यावर अवलंबून नसते. ते वर्तनावर अवलंबून असते. प्रत्येकजण इतरांपेक्षा विशिष्ट वर्तनाकडे अधिक झुकलेला असतो. आपल्या सर्वांची जडणघडण वेगवेगळी असते. आपल्या आवडीनिवडी, भीती आणि स्वप्नेही वेगवेगळी असतात. जेव्हा आपण 'पैसा' हा शब्द ऐकतो, तेव्हा आपल्या सर्वांच्या मनात वेगवेगळे विचार आणि भावनाही येतात. पैशाचे मानसशास्त्र समजून घेतल्यास आपल्याला त्या विचारांची, भावनांची आणि वर्तनाची जाणीव होण्यास मदत होईल. एकदा का तुम्हाला तुमच्या प्रवृत्तींची जाणीव झाली की, तुम्ही तुमच्या स्वताःच्या मनाची, विचारांची आणि इच्छाशक्तीचा वापर करु शकता आणि तुम्ही अक्षरश: तुमचे आयुष्य बदलू शकता.

**आर्थिक यशाची दोन मूलभूत तत्वे**

लेखक सांगतो की आर्थिकदृष्ट्या यशस्वी होण्यासाठी दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. एक म्हणजे आपल्या आर्थिक उद्दिष्टांची स्पष्टता असणे उदा. घर खरेदी, निवृत्ती, बचत, गुंतवणुक इ. आणि दुसरे म्हणजे स्वत:ची योजना तयार करून त्यावर सातत्याने काम करणे. इतरांना प्रभावित करण्यासाठी पैसे खर्च करू नका. तो सर्वात मोठा आर्थिक सापळा आहे.

**पैशाचे मानसशास्त्र: एक सखोल समज**

आपण सर्वजण वेगवेगळ्या परिस्थितीत वाढलेलो असतो. काहीजण गरिबीत तर काहीजण संपन्न वातावरणात वावरत असतात. त्यामुळे प्रत्येकाचा पैशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो.

गरिबीत वाढलेली व्यक्ती पैसे जपून वापरेल तर श्रीमंत घरातील व्यक्ती अधिक जोखीम घेईल. याचा अर्थ असा होतो कि, कोणीही चुकीचा नाही फक्त अनुवभ वेगवेगळे आहेत. लेखकाने पैशाचे मानसशास्त्र स्पष्ट करतांना वेगवेगळे सामाजिक दृष्टीकोन व्यक्त केले आहेत. त्यांनी आपली मत या पुस्तकात एकूण एकोणविस प्रकरणातून विस्तृत पणे उदाहरणासह मांडली आहेत.

मोर्गन हौसेल म्हणतात, कोणीही वेडा नाही. प्रत्येक जन सज्ञान पणे आर्थिक निर्णय घेत असतो. लोक पैशांबाबत वेगवेगळे निर्णय घेतात कारण त्यांचे अनुभव वेगवेगळे असतात. त्यामुळे कोणाचा निर्णय चुकीचा वाटला तरी तो त्यांच्या दृष्टीने योग्य असू शकतो. नशीब आणि धोका हे आर्थिक प्रगतीतले महत्वाचे घटक आहेत. यशामध्ये केवळ मेहनत नसते तर नशीब आणि परिस्थितीचाही मोठा वाटा असतो. त्यांनी आपला हा विचार स्पष्ट करतांना बिल गेट्स यांचे उदाहरण दिले. बिल गेट्स यांना संगणक असलेल्या शाळेत शिकण्याची संधी मिळाली जी त्या काळात अत्यंत दुर्मिळ होती. गेट्स यांना नशिबाने साथ दिल्यामुळे ते यशस्वी झाले.

'पुरे झाले हे कधी  म्हणायचे ते शिकले पाहिजे अन्यथा प्रगतीच्या हव्यासापोटी आयुष्यभर धडपडत राहू हा विचार व्यक्त केला. अनेक श्रीमंत लोक अधिक मिळवण्याच्या हव्यासामुळे सर्व काही गमावतात. आपल्याकडे जे आहे ते धोक्यात घालून अनावश्यक गोष्टी मिळवण्यात वेळ खर्च करतात. चक्रवाढची ताकद प्रत्येकांनी अनुभवली पाहिजे. लहान गुंतवणूकही दीर्घ काळात मोठी होते. यासाठी लेखकाने वॉरेन बफे यांची आर्थिक कार्यपद्धती समजावून सागितली. बफे यांचे यश त्यांच्या गुंतवणुकीच्या कालावधीमुळे आहे. त्यांनी लवकर गुंतवणूक सुरू केली आणि संयम बाळगला.

पैसे कमावणे हि एक तर पैसे टिकविणे हि दुसरी बाब आहे. पैसे कमिण्यासाठी जोखीम घ्यावी लागते. पैसे टिकवण्यासाठी संयम आणि शिस्त आवश्यक असते. टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे हेच सर्वात महत्वाचे आहे. असे हौसेल यांचे मत होते. याशिवाय लेखक असे म्हणतात की, अपयशाचा स्विकार करता आला पाहिजे. तुम्ही किती वेळा चुकलात हे महत्वाचे नाही. मोठे निर्णय घेत राहावेत कारण काही मोठे निर्णयच तुमचे भविष्य ठरवितात.

संपत्तीचा दिखावा कधीच करू नये. लोक तुमच्या गाड्या, घर, वस्तूंनी प्रभावित होत नाहीत. ते स्वतःच्या आयुष्याबद्दल जास्त विचार करतात. त्यांचा मते संपत्ती म्हणजे न दिसणारी गोष्ट जसे बचत, गुंतवणूक तर श्रीमंती म्हणजे दिसणाऱ्या गोष्टी जसे गाडी, घर. लेखकाने आर्थिक प्रगतीत बचतीचे अनन्यसाधारण  महत्व विषद केले आहे. तुमचे उत्पन्न किती आहे हे महत्वाचे नाही तर तुम्ही

किती बचत करता हे महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीने व्यवहार्य असले पाहिजे. पूर्णपणे तर्कशुन्य निर्णय घेणे नेहमी शक्य नसते. आपल्याला झोप लागेल असे निर्णय घेतले पाहिजेत.

अनिश्चितता स्विकारावी लागेल आणि ती निघून जाण्याची वाट पाहावी लागेल. भविष्य अनिश्चित आहे.ईतिहास मार्गदर्शन करतो पण तो भविष्य सांगू शकत नाही. सुरक्षितता निर्माण करणे फार महत्वाचे आहे. नेहमी काही बचत करून ठेवावी आणि अचानक खर्चासाठी तयार राहावे. काळानुसार तुमचे विचार, गरजा आणि ध्येय बदलतात. म्हणून लवचिक योजना ठेवा. तुमचे उद्दिष्ट बदलतील हे लक्षात घेवून योजना आखाव्यात. लेखकाच्या मते यशाची किंमत मोठी असते. यश मिळण्यासाठी तुम्हाला भीती, अनिश्चितता, जोखीम यांचा सामना करावा लागतो. स्वत:चा मार्ग निवडायला शिकले पाहिजे. इतर लोक वेगळा खेळ खेळत असतात. त्यांच्या निर्णयांवर तुमचे निर्णय आधारित ठेवू नका असेही त्यांनी म्हटले. सकारात्मकता बाळगली पाहिजे. दीर्घकाळात अर्थव्यवस्था आणि जीवन सुधारत असते. त्यामुळे अल्पकाळातील अडचणींनी घाबरून जावू नये.

पैशाचे मानसशास्त्र समजावून सांगतांना हौसेल अंतिम निष्कर्षता असे म्हणतात कि, नम्र राहा, बचत करा, संयम ठेवा, दीर्घकालीन विचार करा, जोखीम समजून घ्या आणि पैशांचा उपयोग स्वातंत्र्यासाठी करा. आर्थिक स्वातंत्र्य हे अंतिम ध्येय असले पाहिजे. याशिवाय साधे जीवन आणि जास्त बचत, दीर्घकालीन गुंतवणूक तसेच संयम आणि शिस्त बाळगणे क्रमप्राप्त आहे. पैशांमध्ये यश मिळवण्यासाठी उच्च शिक्षण, मोठे उत्पन्न किंवा विशेष कौशल्य आवश्यक नाही. योग्य विचारसरणी, संयम, आणि चांगल्या सवयी यामुळे कोणीही आर्थिकदृष्टया यशस्वी होऊ शकतो.

'द सायकॉलॉजी ऑफ मनी' हा लघुकथांचा एक संग्रह आहे. जो लोक पैशांबद्दल ज्या विचित्र पद्धतीने विचार करतात त्याचा शोध घेतो. लेखक एखाद्याच्या आर्थिक परिणामावर परिणाम करणारे संबंधित पुर्वग्रह, दोष, वर्तन आणि दृष्टिकोन सादर करतात आणि एखाद्याचे मानसशास्त्र त्यांच्या बाजूने आणि विरोधात कसे काम करू शकते हे दाखवतात. या ज्ञानाचा उपयोग करून आपण जीवनातील सर्वात महत्त्वाच्या विषयांपैकी एक असलेल्या पैशाला अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो असा त्यांचा युक्तिवाद आहे. पुढे या प्रेरणादायी पुस्तकाचा सारांश मांडण्याचा एक प्रयत्न केला आहे. यात काही संक्षिप्त आणि कृतीयोग्य धडे आहेत जे तुम्हाला अधिक चांगले आर्थिक निर्णय घेण्यास मदत करू शकतात. आपली मानसिकता आपल्या हितासाठी कशी कार्य करू शकते किंवा आपल्या विरोधात कशी जाऊ शकते याचे मार्गदर्शन हे पुस्तक करते.

## Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College, Pinjar, Dist. Akola
## Department of Economics
## Academic Activity Report (2025–2026)

The Internal Quality Assurance Cell (IQAC) directed all departments to prepare structured academic plans. Accordingly, the Department of Economics implemented all activities in alignment with university norms and successfully completed them. This report is presented for the kind information of IQAC.

**1. Department-Level Curriculum Activities**

**1.1 Induction Program (21–24 July 2025)**

**1.2 Capacity Building Programs**

- Financial Literacy Workshop (8 July 2025)
- NEP Awareness Workshop (21 July 2025)
- One-Day Seminar (3 February 2026)

**2. Extension, Co-curricular and Field-Based Activities**

- Delivered lecture on economic thoughts of Annabhau Sathe and Lokmanya Tilak (1 August 2025)
- Participated as Resource Person at National Conference, RDG College, Akola (30 August 2025)
- Delivered lecture on "Today's Education System and Role of Teachers" on Teachers' Day (5 September 2025)
- Delivered NEP awareness lecture at Shri Gajanan Maharaj Mahavidyalaya, Borgaon (18 September 2025)
- Presided over inauguration of Samajik Shastra Abhyas Mandal and delivered lecture at Shri Dhabekar Kala Mahavidyalaya, Khadki (26 September 2025)

**3. Contribution to Corporate Life (Institutional Responsibilities)**

- Worked as Valuer for B.A. II Semester IV University Examination (12–14 June 2025)
- Member of CHB Teacher Selection Committee at Shri Shivaji College, Akola (18 July 2025)
- Attended Board of Studies meeting (Economics), SGB Amravati University (25–26 July 2025)
- External Expert for Ph.D. Pre-Defense (14 August 2025 & 11 April 2026)

- Attended Question Paper Moderation Committee meetings at SGB Amravati University.

**4. Professional Development Activities**

| Sr. No. | Activity | Organizer |
|---|---|---|
| 1 | One-Day Workshop on NEP (8 August 2025) | SGB Amravati University |
| 2 | Two-Day Workshop on Curriculum Reengineering (24–25 March 2026) | KBC North Maharashtra University |
| 3 | NEP Implementation Review (2 September 2025) | SGB Amravati University |

**5. Research Contribution**

**5.1 Research Guidance**

- 4 Ph.D. scholars enrolled
- 2 submitted synopsis (approved by the University)
- 2 scholars are in progress

**5.2 Research Paper Presentations**

- Presented paper at Marathi Arthashastra Parishad Conference (2–4 Nov 2025) Topic: Dr. Manmohan Singh: Leadership and Economic Reforms
- Presented paper at National Conference, MES College Mehakar (7 April 2026) Topic: Traditional Agricultural Practices as a Model of Indian Knowledge System

**5.3 Publications in Journals**

- Di-rective Principles and Economic Transformation – A Micro Analysis Published in Research Nebula (Aug 2025, ISSN: 2277-8071)
- E-commerce and Digital Transformation: Opportunities and Challenges Published in Research Nebula (Dec 2025, Vol. XIV, Issue III)
- Analysis of Poverty with Special Reference to Justice M.G. Ranade Published in Akshara Journal (Feb 2026, Special Issue)

**6. Contribution to University and College Administration**

- Member, Board of Studies in Economics, SGB Amravati University
- Chairman, Admission Committee (B.A. II)
- Coordinator, NEP & Feedback Cell
- Nodal Officer, NEP, MIS & AISHE
- Member, College Development Committee, IQAC, and ICC

**Conclusion**

The Department of Economics successfully conducted all planned academic and co-curricular activities for the academic session 2025–2026. The department strictly adhered to university guidelines and actively contributed to teaching, research, and institutional development.

**Result Position of Department (Summer 2025)**

| Sr. No. | Class | Department | | | College | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Examinee | Passed | % | Examinee | Passed | % |
| 1 | B.A.I (Sem II) | 18 | 13 | 72.22 | 74 | 50 | 67.56 |
| 2 | B.A.II (Sem IV) | 38 | 24 | 63.16 | 75 | 31 | 41.33 |
| 3 | B.A.III (Sem VI) | 43 | 38 | 88.37 | 71 | 52 | 73.23 |
| | | **99** | **75** | **75.75** | **220** | **133** | **60.45** |
| **Avg. Result** | | **Dept.89.63%** | | | **College 61.93%** | | |

**Admission Status of Department (2025-2026)**

| Sr. No. | Class | No.of Student Admitted | |
|---|---|---|---|
| | | College | Economics |
| 1 | B.A.I (Sem I) NEP | 97 | 40 |
| 2 | B.A.II (Sem III) NEP | 65 | Major-06 Minor-07 |
| 3 | B.A.III (Sem V) CBCS | 66 | 31 |
| | **Total** | **228** | **84** |

**W-2025 Exam Result Position (B.A. Semester I, III & V)**

| **Exam** | **Total Admission** | **Student of Economics** | **Examinee** | **Passed** | **%** |
|---|---|---|---|---|---|
| Sem I | 97 | 40 | 36 | 12 | 33.33 |
| Sem II | 65 | Major-06 | Major (V) 06 | 06 | 100 |
| | | | Major (VI) 06 | 06 | 100 |
| Sem V | 66 | `Major-07 | Minor (III) 07 | 06 | 85.71 |
| | | 31 | 31 | **31** | 100 |

# भारतीय संविधानाच्या जडणघडणीत डॉ. पंजाबराव देशमुख यांचे योगदान

डॉ. वासुदेव वा. भगत
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

**प्रास्ताविक :-**

भारतीय संविधान सभा १९४६ च्या डिसेंबर मध्ये अस्तित्वात आली. डॉ. पंजाबराव देशमुख यांची काँग्रेस पक्षातर्फे मध्यप्रांत वऱ्हाडातून निवड करण्यात आली. अप्रत्यक्षरित्या निवडलेल्या प्रतिनिधींना संविधान सभेचे सदस्य म्हणून संविधानाच्या जडणघडणीत संधी मिळाली. ९ डिसेंबर १९४६ ते २६ नोव्हेंबर १९४९ या जवळ जवळ तीन वर्षाच्या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुखांनी संविधानसभेच्या वादविवादात भाग घेतला. बहुसंख्य सदस्य काँग्रेस पक्षाचे असल्यामुळे त्यांना पक्षशिस्तीचे बंधने पाळावी लागत असत. तथापि डॉ. पंजाबराव देशमुख यांनी राजकीय पक्षाच्या नियमांना झुगारून संविधान सभेत आपल्या मताचे निर्भयपणे प्रतिपादन केले होते. त्यामधून त्यांनी स्वविवेकानुसार संविधानाच्या प्रस्तावातील उणीवा निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांना आवडलेल्या तरतुदींचे तेवढ्याच उत्साहाने त्यांनी समर्थन सुद्धा केले होते. थोडक्यात डॉ. पंजाबराव देशमुख यांचे संविधान निर्मितीच्या प्रक्रियेतील योगदान स्वत:च्या काँग्रेस पक्षाच्या दबाव, विचार, शिस्त याचे समर्थन करणारे नव्हते. तसेच संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर  यांच्या सर्वच प्रस्तावाचे समर्थन करणारे नसून स्वतंत्र वैचारिकतेवर आधारलेले होते. त्यांच्या या स्पष्ट,व निर्भीड आणि शोषीत, पिडीत तसेच शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याच्या प्रवृत्तीची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना झाली होती. म्हणूनच त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या वैशिष्टयपूर्ण अशा योगदानाचा उल्लेख संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात केल्याचे नमूद आहे. भारताच्या संविधान निर्मितीच्या एकूण दोन वर्ष अकरा महिने आणि सतरा  दिवसाच्या कालावधीतील त्यांचे योगदान अनेक विषयाबाबत अतिशय विस्तारित स्वरुपाचे असल्याचे कोणासही नाकारता येत नाही. हा मोठ्या संशोधनाचा विषय असल्याची जाणीव सुद्धा आहे. म्हणूनच एकूण योगदानातील काही ठराविक तरतुदीसंबधीचे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे संविधानाच्या निर्मितीतील योगदान उपरोक्त संशोधन लेखात मांडण्यात आले आहे.

**भारतीय संविधानाच्या जडणघडणीत डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सहभाग**

**१) मुलभूत हक्काच्या प्रस्तावावर दुरुस्ती :-** २९ एप्रील १९४७ ला सरदार पटेल यांच्या मुलभूत हक्क समितीने संविधान सभेत सादर केलेल्या मुलभूत हक्कातील समतेच्या हक्कावर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी दुसऱ्या खंडात सुधारणा सुचविली. त्यासंबंधी ''समतेच्या हक्कात केवळ समता सूचक अधिकाराची यादी नमूद करण्यात यावी त्यावरील न्यायालयीन नियंत्रणाचा उल्लेख करण्यात येऊ नये. केवळ धर्म, वंश, जात अथवा स्त्री-पुरुष या आधारावर राज्य कोणत्याही नागरिकांविरुद्ध भेदभाव ठेवणार नाही.''[१] परंतु न्यायालयाचे नियंत्रण किंवा समतेच्या तत्वाचे उलंघन करणाऱ्या विरुद्ध न्यायालयात जाण्याचा अधिकार असल्याशिवाय वास्तविक मुलभूत हक्काची अंमलबजावणी होऊ शकत नाही. या आधारे डॉ. देशमुख यांची दुरुस्ती मुलभूत हक्क समितीने नाकारली होती.

**२) राष्ट्रध्वजाच्या प्रस्तावावर दुरुस्ती :-**

भारताचा राष्ट्रध्वज घटना समितीद्वारे सविस्तर चर्चा करून अशोक चक्रांकीत तिरंगी राष्ट्रध्वज स्विकारण्यात आला. पं. जवाहरलाल नेहरू यांनी प्रस्तुत केलेल्या राष्ट्रध्वजाचे महत्व, योग्यता आपल्या भाषणातून स्पष्ट केली. तथापि डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या २२ जुलै १९४७ च्या भाषणात देशाच्या तिरंगी राष्ट्रध्वजावर चरख्याचे चित्र असावे अशी दुरुस्ती सुचविली होती. आपल्या दुरुस्तीच्या मौलीकतेबाबत ते म्हणतात, ''चरखा हे अहिंसेचे प्रतिक असून त्याचा महात्मा गांधीच्या नावाशी अतूट संबंध असल्याचे नमूद केले. सभागृहाने स्विकारलेला अशोकचक्राचा राष्ट्रध्वज बहुमताचा आहे. तरीही माझ्या सूचनेचे महत्व अबाधित राहते.''[२] यामधून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्वतंत्र विचार पद्धतीने संविधान सभेत सहभाग दर्शविल्याचे स्पष्ट होते.

**३) हक्क आणि नागरीकत्वासंबंधिचा प्रस्ताव :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मसुदा समितीने ५ आणि ६ अनुच्छेदातील विवरण घटना समिती पुढे ११ ऑगष्ट १९४९ ला सादर केले. त्यानुसार अधिवासाच्या अंतर्गत भारतीय नागरिकत्व देण्यात आले होते. पाच वर्षे भारतात वास्तव्य करणाऱ्या व्यक्तीस नागरिकत्व देण्याची तरतूद स्विकारण्यात आली होती. या तरतुदीस डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्पष्ट विरोध नोंदविला होता. त्यासंबंधी त्यांनी म्हटले होते, ''भारताचे नागरिकत्व इतक्या स्वस्तात व सहजासहजी मिळण्याची तरतूद करू नये तसेच पाच वर्षाच्या वास्तव्याच्या अटी ऐवजी किमान बारा वर्षाच्या वास्तव्याची अट त्यांनी सुचविली होती.''[३] तसेच पुढे त्यांनी संघराज्य पध्दतीला सुद्धा विरोध केल्याचे नमूद आहे.

त्यांनी संघराज्य पद्धती टाळून एकात्मिक शासन पद्धतीचे समर्थन केले होते.

**४) राष्ट्रपती राज्यपालाच्या अध्यादेश प्रस्तावाचे समर्थन :-**

संसदेचे अधिवेशन सुरु नसताना राष्ट्रपतीस देशासाठी आणि विधीमंडळाचे अधिवेशन सुरु नसतांना राज्यपालास राज्यासाठी आवश्यकतेनुसार तातडीचा अध्यादेश काढण्याच्या अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. या प्रावधानास डॉ. पंजाबराव देशमुख यांनी २३ मे १९४९ च्या संविधान सभेतील भाषणात पाठिंबा दिला. शिवाय विरोध दर्शविणाऱ्या सदस्यावर प्रभावीपणे टीका केली. हरिभाऊ कामथ, कुंझरू, के .टी. शहा, सरदार हुकूमसिंग यांनी अध्यादेशाच्या तरतुदीचे परीक्षण करून सुधारणा सुचविल्या होत्या. त्याबाबत डॉ. देशमुख म्हणाले, ''महोदय मला खेद आहे की, मी स्वत:ला प्रो. शहा यांच्या विचारधारेच्या अनुकूल समजत नाही. आणि त्यांनी प्रस्तुत केलेल्या संशोधनाचे समर्थन करू शकत नाही.''[४] डॉ. देशमुख यांनी संविधान सभेत केवळ विरोध किंवा टीकाच केली नसून त्यांच्या सद्सद्विवेकानुसार अनेक सदस्यांच्या विरोधास न जुमानता समर्थन केल्याचे उपरोक्त तरतुदीसंबंधी त्यांच्या मतावरून स्पष्ट होते.

**५) संविधानातील लेखापरीक्षक तरतुदीचे समर्थन :-**

मसुदा समितीद्वारे भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक पदाची तरतूद अनुच्छेद १४८ ते १५९ मध्ये करण्यात आली. त्यासंबंधीचा प्रस्ताव ३० मे १९४९ रोजी डॉ. आंबेडकरांद्वारे संविधान सभेत प्रस्तूत करण्यात आला. त्यावर अनेक वादप्रतिवाद झाले. पंडीत कुंझरू यांनी महालेखापरीक्षकास केवळ केंद्र व राज्य सरकारांचा जमाखर्च तपासण्यासह स्वायत निगमांचे हिशोब तपासण्याचे अधिकार असावे अशी दुरुस्ती सुचविली. उलट डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात, ''डॉ आंबेडकरांनी संशोधनाचा प्रस्ताव ठेवला आहे त्याने आता हे स्पष्टीकरण न केवळ वर्तमान विधीच नव्हे तर अध्यादेश, उपविधी, नियम आणि विनियम सुद्धा, जे संविधान प्रयोगात येण्यापूर्वी स्विकारण्यात आले असतील आणि या वेळी प्रवर्तनात असतील, सम्मिलित करण्यात आले आहेत.''[५] अशा प्रावधानाची तरतूद संविधानाच्या प्रस्तावात असल्यामुळे पं.कुंझरू यांचे संशोधन स्विकारणे आवश्यक नसल्याचे त्यांनी पुन्हा नमूद केले होते.

**६) व्यापाऱ्यांच्या अवाजवी अधिकारावर डॉ. पंजाबराव देशमुख यांची टिका :-** संविधान सभेद्वारे प्रत्येक राज्यास आपल्या राज्यांतर्गत बाहेरच्या राज्यातून व्यापार करण्यास येणाऱ्या व्यापाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचा कायदा करण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आला होता. त्यासंबंधीचा प्रस्ताव मसुद्यातील अनुच्छेद १७० नुसार ३ जून १९४९ रोजी प्रस्तूत करण्यात आला. यावर प्रा. के . टी. शहा

यांनी व्यापाऱ्यांच्या हित रक्षणासाठी राज्यांनी केलेल्या कायद्याविरुद्ध हे व्यापारी ज्या घटक राज्याचे असतील त्या राज्य सरकारास सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार असला पाहिजे. अशी दुरुस्ती अनुच्छेद १७० ए  अंतर्गत सुचविली. प्रा. शहा यांच्या व्यापाऱ्यांचा कैवार घेण्याच्या धोरणाचे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अतिशय स्पष्ट शब्दात वाभाडे काढले. अशा अधिकारामुळे व्यापाऱ्याकडून राज्यसरकारवर दबाव येऊन जनमानसाचे शोषण करण्यात येऊ शकते असे त्यांचे मत होते. संविधान सभेतील आपल्या भाषणात डॉ. देशमुख म्हणतात, ''मी हे आग्रहपूर्वक  सांगू इच्छितो की भारतात व्यापार, व्यवसायात व्यस्त असणारे लोक प्रामाणिक सिद्ध झाले नाहीत. यांच्या व्यवसायाचा आधार धोकेबाजी हाच राहिला आहे... प्रामाणिकपणे व्यापार करून जो लाभ होतो त्याने व्यापारी संतुष्ट नाहीत... या दृष्टीने मी त्या मौलीक अधिकाराला सुद्धा पसंत करीत नाही, ज्याच्या आधीन कोणीही व्यक्ती कोठेही भूमी तथा संपत्ती अर्जीत करू शकते. कारण विपुल संपत्ती अर्जित करण्याचा अर्थच असा आहे की ती न्यायोचित मार्गाने अर्जित करण्यात आली नाही. जर एखादे राज्य या अनुचित प्रयासांना रोखण्याकरिता पुढे येत असेल तर त्याला याचे पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त व्हावयास पाहिजे आणि समाजाच्या या शत्रूंना दंडित करण्याच्या मार्गात कोणतीही बाधा उपस्थित केली जाऊ नये.''[६] यामध्ये त्यांनी व्यापाऱ्यांकडून करण्यात येणारी भेसळ यावरसुद्धा भाष्य केले होते. महाराष्ट्र आणि अन्य राज्यातील सावकाराकडून गरीब अल्प भूधारक शेतकऱ्याच्या जमिनी व्याजाद्वारे काबीज केल्याची आकडेवारीही संविधान सभेपुढे त्यांनी सादर केली होती. डॉ. पंजाबराव देशमुख यांची भारतातील गरीब, श्रमिक, शेतकरी यांच्या बद्दलची आत्मीयतेची वास्तविक भावना त्यांनी नमूद केली होती. याची जाणीव संविधान सभेतील उपस्थित सर्वच सदस्यांना झाली होती. त्यामुळेच नम्रपणे प्रो. के . टी. शहा यांनी व्यापाऱ्यांच्या अधिकारासंबंधीचा दुरुस्ती प्रस्ताव मागे घेत असल्याचे जाहीर केले. डॉ.देशमुख यांचे संविधान सभेतील योगदान निर्भय आणि आत्मीयता या स्वरुपाचे असल्याचे लक्षात येते.

वरील विषयातील सहभागाशिवाय त्यांनी संसद सदस्यांचे विशेष अधिकार आणि त्यांची पदमुक्तीच्या प्रक्रियेतील चर्चेत सहभाग दर्शविला. शिवाय राज्यपाल, मुख्यमंत्री यांचे अधिकार कार्य, खाजगी मालमत्तेच्या अधिकाराची व्याप्ती याबाबत त्यांनी सुधारणा सुचविल्या होत्या. शेवटी भारतीय संविधानाचे अन्य मान्यता प्राप्त भाषांमध्ये भाषांतर करण्यात यावे अशी मागणी केली होती. प्रस्तुत संशोधन लेखात संविधानसभेतील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विस्तृत सहभागातील वरील प्रमाणे ठराविक विषयातील सहभाग मांडण्यात आला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१) अनुवादक, प्रा. घोडेस्वार देविदास, संविधान सभा डिबेटस (मराठी संस्करण) निकाय : 1. Right Thinkers Publication & Documentation Pvt. Ltd. Nagpur. प्रथम संस्करण २०१३ पृ. ४३२

२) पूर्वोक्त पृ. ८०५

३) अनुवादक, प्रा. घोडेस्वार देविदास, संविधान सभा डिबेटस (मराठी संस्करण) निकाय : 7. Right Thinkers Publication & Documentation Pvt. Ltd. Nagpur. प्रथम संस्करण २०१३ पृ. ४६५

४) अनुवादक, प्रा. घोडेस्वार देविदास, संविधान सभा डिबेटस (मराठी संस्करण) निकाय : 5. Right Thinkers Publication & Documentation Pvt. Ltd. Nagpur. प्रथम संस्करण २०१३ पृ. २९१

५) पूर्वोक्त पृ. ५३५

६) अनुवादक, प्रा. घोडेस्वार देविदास ,संविधान सभा डिबेटस (मराठी संस्करण) निकाय : 6. Right Thinkers Publication & Documentation Pvt. Ltd. NagMur. प्रथम संस्करण २०१३ पृ. १६३

७) https://bhaoosaheb.blogspot.com/2014/12/blog-post_78.html?m=1

# सत्र २०२५-२६ राज्यशास्त्र विषयाचे प्रवेशीत आणि परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी

| अ.क्र. | वर्ग | महाविद्यालयातील एकूण प्रवेशीत विदयार्थी | राज्यशास्त्र विषयाचे प्रवेशीत विदयार्थी | परिक्षेला बसलेले विदयार्थी | पैकी उत्तीर्ण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | B.A.I Sem-I | 97 | 55 | 49 | 19, 38.78% |
| २ | B.A.II Sem-II | 65 | Major 19 | 19 | Major 3 :- 17, 89.47%<br>Major 4 :- 18, 94.73% |
| | | | Minor 11 | 11 | 09, 81.81% |
| ३ | B.A.III Sem-V | 66 | 62 | 62 | 55, 88.31% |

## सत्र २०२५-२६ मध्ये राज्यशास्त्र विभागाद्वारे राबविलेले उपक्रम

१) दिक्षारंभ कायक्रमाचे आयोजन २१ ते२६ जुलै २०२५

२) भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान जागृती कायक्रम २२ सप्टेंबर २०२५

३) २६ नोव्हेंबर २०२५ संविधान दिनानिमित्त भाषण स्पधेचे, निबंध स्पर्धेचे आयोजन.

४) १० डिसेंबर २०२५ मानवी हक्क दिनाचे आयोजन

५) ६ फेब्रुवारी २०२६ अभ्यास दौरा नंगारा भवन पोहरादेवी

**महाविद्यालयत्तर उपक्रम आणि विद्यापीठातील कार्यातील सहभाग**

१) Short-Term Course 17 to 27 June 2025 (UGC MMTT Centre

२) विद्यापीठातील मूल्यांकन B A Sem I 16 ते 18 जुलै 2025

३) Presented Reserch Paper One Day National Conference, R.G. College Akola

४) अधिव्याख्याता पदाच्या मुलाखतीसाठी विषयतज्ञ म्हणून नियुक्ती

५) विद्यापीठातील मूल्यांकन B A Sem I १६ ते २० डिसेंबर २०२५

६) प्रमुख मार्गदर्शक रा.से.यो. विशेष शिबिर (श्रीमती पंचफुलाबाई पाटील) समाजकार्य महाविद्यालय, अकोला.

७) NEP 2020 ORIENTATION & SENSITIZATION PROGRAMME MMTT Programme 16th to 28th February 2026

८) विद्यापीठातील मुल्यांकन B A Sem VI २८ ते ३१ मे २०२६.

९) **संशोधन लेख**

१) 'सामान्यांना असामान्यत्व बहाल करणारा प्रलेख : भारतीय संविधान'
RESEARCH NEBULA, Special Issue, August 20 25,
ISSN 2277-8071 DOI PREFIX 10.22163

२) 'तंत्रज्ञानाधीष्ठीत समाजातील सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण - एक राज्यशास्त्रीय चिंतन, Vidyawarta, Special Issue-02
February 24, 2026 MAH/MUL/03051/5012 ISSN:23199318

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि श्रीधर टिळक, संपादक डॉ. संजय जे. भगत.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर (वंचितांचा आवाज आणि सामाजिक क्रांतीचे नेतृत्व)
आधार पब्लिकेशन्स अमरावती एप्रिल २०२६.

## Swami Vivekananda's Thoughts On Meditation

Dr. Ramkrushna N. Gawande
HOD and Assistant Professor
in English B.L.D. AAS College,
Pinjar Dist. Akola

Swami Vivekanands was one of the greatest spiritual teachers and thinkers of modern India. He Introduced Indian philosophy, especially Vedanta and Yoga, to the Western world and inspired millions of people through his speeches, writings and teachings. His ideas on meditation is not merely a religious activity but a powerful means of developing concentration, self-confidence, inner peace, and realization of the true self.

In today's fast-moving and stressful world meditation has become more important than ever. Students and young people often face, anxiety, Confusion and lack of concentration. Swami Vivekananda's teachings on meditation offer guidance for achieving mental balance emotional strength and Spiritual growth. this thoughts continue to inspire people across the world even today.

Swami Vivekananda considered meditation to be the highest form of concentration. He believed tha that the human mind possesses infinite power but it remains scattered because of worldly distractions Meditation helps in controlling and focusing the mind.

He said that meditation is the process through which a person turns inward and realizes the divinity present within oneself. According to him. every soul is potentially divine, and the purpose of life is to manifest this divinity through self-discip knowledge devotion and meditation.

For Vivekananda, meditation was not escapism from life. Instead, it was

a method gaining Strength and clarity to face life courageously He emphasized that a calm and concentrated mind can achieve great success in every field. One of his famous ideas was :

"The power of concentration is the only key to the treasure-house of knowledge."

This Statement highlights the importance meditation in developing concentration and wisdom.

Swami Vivekananda believed that the mind is naturally restless. Thoughts continuously arise in the human mind creating confusion and distraction. Through meditation a person learn to control these thoughts and attain peace.

He explained that an uncontrolled mind leads to weakness and suffering whereas a disciplined mind leads to success and happiness. Meditation trains the mind to become steady and focused.

According to him, the mind can be compare to a monkey that is constantly jumping from one thought to another. Meditation gradually calms this restless nature. He advised people to practice meditation daily with patience & regularity.

He also taught that purity of thought self control and positive thinking are essential to successful meditation. A poor mind can concentrate more effectively & experience inner joy.

Concentration occupied a central place in Vivekananda's philosophy of meditation. He believed that all knowledge and achievement depend upon concentration. Whether a person is studying, working praying or meditating concentration is necessary for success.

According to him, ordinary people waste much of their mental energy because their thoughts are scattered. Meditation gathers this scattered energy & directs it toward a single point.

He encouraged students especially to practice concentration because it improves memory, understanding and confidence. In his opinion, education is not merely collecting information but training the mind to concentrate.

He once stated :

"Take up one idea. Make that one idea your life."

This teaching shows his belief in focussed effort & mental discipline.

Swami Vivekananda had great faith in the youth of India. The believed that young people possess immense energy & potential. However this energy must be directed properly through discipline & concentration. Meditation according to him, is highly beneficial for students because it

Improves concentration and memory.

Reduces stress and anxiety.

Builds self-confidence.

Develops positive thinking.

Enhances emotional stability.

Increases willpower.

Today's students face many distractions due to technology, social media, and academic pressure. Meditation helps them remain calm and focussed. Vivekananda believed that strong minds create strong individuals and strong nations.

His inspiring message to the youth was : "Arise, awake, and stop not till the goal is reached."

Meditation supports this Spirit of determination and perseverance.

Swami Vivekananda gave great importance to meditation as a means of developing concentration inner strength and spiritual realization. According to

him, meditation awakens the hidden powers of the human mind & leads a person toward peace & self-confidence. His teachings continue to inspire millions of people around the world. Meditation is useful for students, teachers, professionals and ordinary individuals alike. Through regular meditation one can overcome fear, anxiety and distraction and live à balanced and meaningful life.

Admitted Students to English Language for the session 2025-26 and Result

| Sr. No. | Class | Subject | Admitted Stu. | Examiners | Passed | Percentage |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | B.A.I(Sem 1) | DSC | 111 | 97 | 76 | 78.35% |
| | | SEC & AEC | 111 | 97 | 69 | 71.13% |
| 2. | B.A.II(SemIII) | Major III DSC | 09 | 09 | 09 | 100% |
| | | Major IV | 09 | 09 | 09 | 100% |
| | | Major IKS | 09 | 09 | 09 | 100% |
| | | Minor | 07 | 07 | 07 | 100% |
| 3. | B.A.III (Sem V) | English | 66 | 66 | 56 | 84.85% |

# Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College,
# Pinjar Dist-Akola.
## Department of English
## Academic Activity Report (2025-26)

The internal Quality Assurance Cell (IQAC) directed all departments to prepare structured academic plans. Accordingly the Department of English implemented all activities in alignment with University norms and successfully completed them. Thus report is presented for the kind information of IQAC.

**1. Department level Curriculum Activities.**

Induction program. (21 to 24 July 2025)

The Induction program of English Department was organized on 22nd July, 2025. The Students were given information about Syllabus and various activities held during the session.

**Study tour in collaboration with Department of Political Science.**

On dated 6 Feb, 2025 study tour in collaboration with department of Political Science was organized to study Nangara Bhavan (Banjara Virasat) at Poharadevi.

In this study tour the characteristics of Nangara Bhavan, its historical importance and its Social Status was discussed by the organizer to the students. The aim and historical status was discussed thoroughly to the students. The Students were pleased as they could directly received the informations about the Banjara community. The study tour was very useful due to the historical knowledge about cultural & social life of Banjara community.

* Worked as values for B.A.I, BA.II and B-A. Final year University exam.

...2...

* Participated and presented research Paper titled, "Opportunities and challenges in the National Education Policy (NEP) 2020 in one day National Seminar held on 29th March, 2025 at Appaswami Mahavidhyalaya, Shendurjana (Adhao).

  Presented research paper titled

  "The Environmental Impact of climate change on the production of Onion and Garlic in Yavatmal District' in one day Multidisciplinary National Conference on "Emerging Trends in Higher Education in the light of NEP-2020 at Mungsaji Maharaj Mahavidhyalaya, Darwha on 27 February, 2025.
* Organized Elocation Competition on occation of Dr.Sarvapalli Radhakrishna's Birthday (Teacher's Day) on 5th Sept 2025.
* Worked as Co-officer-in-charge at Smt Salunkabai Raut Mahavidhyalaya Wanoja during 15.04.2025 to 17.07.2025.
* Attended Short term Course conducted during 16 to 28 February, 2026 in online mode at MMTTC RTM Nagpur University Nagpur in collaboration with Jagdamb Mahavidhyalaya Achalpur.
* Organized Degree Distribution Program on dated 24 March, 2026 and distributed Fifty degree to the pass out students by Honourable Principal & Hon. Gangadharji Darade, Thanedar Pinjar Police Station.

# ए. आय आणि ग्रंथालय ज्ञान विश्वाची नवी दिशा

डॉ. रेखा सुखदेवराव काळबांडे
(ग्रंथालय विभाग प्रमुख)

ए. आय. म्हणजे संगणकाला मानवी बुद्धिमतेसारखी क्षमता देणारे तंत्रज्ञान कृत्रिम वस्तूने दर्शविलेल्या बुद्धिमान वर्तनास कृत्रिम बुद्धिमता (Artificial Intelligence) ए.आय असे म्हणतात, जसे की संगणक, ए आय ही संगणक शास्त्रातील एक महत्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण (Machine Learning) त्याचे बुद्धिमान वर्तन व परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदीचा अभ्यास केला जातो.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये कृत्रिम बुद्धिमता हे शिक्षण आरोग्य सेवा, व्यवसाय, वाहतूक, सुरक्षा यासह जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये ए.आय चा झपाट्याने विस्तार होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय सेवा केवळ पुस्तक देण्याघेण्यापूर्वी मर्यादित राहिलेली नाही कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाने राधालय क्षेत्रात नवी परिवर्तन घडवून आणले आहे. ग्रंथालय व्यवस्थापन माहिती शोध प्रक्रिया, वाचक सेवा आणि डिजिटल संसाधने या सर्व स्तरावर ए आय चा प्रभाव दिसून येतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही अशी तंत्रज्ञान प्रणाली आहे जी मानवी बुद्धिमतेप्रमाणे निर्णय घेणे, विचार करणे, प्रश्न सोडविणे यास सक्षम बनविणारी तंत्रज्ञान शाखा आहे. पारंपारिक ग्रंथालयीन सेवेमध्ये आपण वाचकापर्यंत माहिती योग्य वेळी पोहचविण्याचे काम करत असतो, पण या प्रक्रियेला वेळ लागतो. या उलट या उद्दिष्टाला अधिक अचूक वेगवान व बुद्धिमान स्वरूप प्रदान करते. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या युगात माहितीचे संकलन आणि व्यवस्थापन आणि प्रसारण या प्रक्रियामध्ये आमुलाग्र बदल घडत आहे डिजिटल क्रांतिकारी इंटरनेट, क्लाऊड कम्प्युटिंग, बिग डेटा इत्यादी तंत्रज्ञानाने ग्रंथालयाची कार्यपद्धती अधिक वेगवान अचूक आणि वापरता केंद्रित बनविली आहे. याच तंत्रज्ञानाचा टप्पा म्हणजे कृत्रिम बुद्धिमता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) ज्याने आधुनिक ग्रंथालय शास्त्राच्या विकासाला नवे वळण दिले आहे. पारंपारिक ग्रंथालय आता स्मार्ट आणि डिजिटल ग्रंथालयात रूपांतरित होत आहे.

ग्रंथालय सेवांमधील ए.आय. आधारित सेवा प्रणालीचा अभ्यास करणे त्याचबरोबर या तंत्रज्ञानामुळे वाचक व ग्रंथपाल यांच्यामधील परस्पर संबंध कसा बदलत आहे हे लक्षात घेणे.

**गंथालयामध्ये ए आय चा वापर :**

**१) स्मार्ट सर्च सिस्टीम :**

ए.आय मुळे वाचकांना आवश्यक असलेली माहिती पटकन आणि अचूक मिळते आपण फक्त कीवर्ड टाकले असता त्या संबंधित सर्व माहिती, पुस्तके, लेख, संशोधन, पेपर्स सुचविले जातात.

**२) डिजिटल कॅटलोगिंग :**

पारंपारिक पद्धतीमुळे खूप वेळ लागत असे परंतु ए.आय.च्या मदतीमुळे पुस्तकाचे वर्गीकरण आणि नोंदणी अधिक जलद आणि अचूक होते.

**३) चाट बोट सेवा :**

ग्रंथालयात ए आय आधारित चाट चॉट वापरून वाचकाच्या प्रश्नांची तात्काळ उत्तरे दिली जातात.

**४) वाचन सवयीचे विश्लेषण:**

ए आय वापरकर्त्याच्या आवडीनिवडी समजून त्यानुसार पुस्तकाची शिफारिश करते

**५) ई. ग्रंथालय (E. Library)**

ए.आय. डिजिटल ग्रंथालय अधिक सुलभ आणि प्रभावी बनले आहे घरबसल्या पुस्तक मिळते, डिजिटल आर्कार्व्हिंग आणि डेटा व्यवस्थापन स्वयंचलित डुप्लिकेशन शोध, फाईल टॅगिंग आणि सुरक्षा प्रणाली.

**कृत्रिम बुद्धिमतेचे फायदे (Advantages of Al Libraries)**

१) व्यवस्थापनातील पारदर्शकता

२) डेटा आधारित निर्णय प्रक्रिया

३) वेळ आणि साधनांची बचत

४) अचूक आणि वेगवान माहितीचा शोध

**आव्हाने व मर्यादा: (Challenges and Limitations)**

१) जास्त खर्च आणि तांत्रिक पायाभूत सुविधांची कमतरता

२) प्रशिक्षित कर्मचा-यांचा अभाव

३) डेटा गोपनीयतेचा तसेच सुरक्षितेचा प्रश्न

४) पारंपारिक ग्रंथालय कर्मचाऱ्याना बदल स्वीकारणे.

**भविष्यातील ग्रंथालय :**

भविष्यात ए आय आधारित स्मार्ट ग्रंथालये ही माहिती शास्त्राच्या विकाराची नवी दिशा ठरतील तसेच भविष्यामध्ये ग्रंथालय स्वयंचलित आणि वापरता केंद्रीत असेल. ए.आयमुळे ग्रंथालय केवल माहिती देणारी संस्था न राहता 'ज्ञान मार्गदर्शक बनतील वर्चुअल रियालिटी, ऑटोमोशन आणि रोबोटिक्स यांचाही वापर वाढेल.

कृत्रिम बुद्धिमता ही ग्रंथालय क्षेत्रासाठी परिवर्तनकारी शक्ति ठरली आहे, ती पारंपारिक सेवा अधिक प्रभावी, वेगवान आणि वाचकाभिमुख बनवते मात्र तिचा पूर्ण लाभ घेण्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण, आर्थिक गुंतवणूक आणि धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञानासोबत मानवी मूल्य आणि वाचन संस्कृती जपणे ही तितकेच आवश्यक आहे योग्य समतोल साधला तर ए.आय.च्या काळामध्ये ग्रंथालयाचे भविष्य उज्वल ठरू शकते.

## ग्रंथालय अहवाल

महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीत ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. ग्रंथालय हे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे ज्ञानाचे भांडार असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अध्ययन अध्यापन प्रक्रियेसाठी ग्रंथालयाचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. ग्रंथालय विभागाने सत्र २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध उपक्रम राबविले असून विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा चांगलाच सहभाग लाभला आहे.

ग्रंथालयामध्ये एकूण ४२२७ पुस्तके आहेत.आवश्यकतेनुसार नियतकालीके आणि वर्तमानपत्र उपलब्ध आहेत. याशिवाय संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोष, शब्दकोश, नकाशे, कथा, कादंबरी, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शक पुस्तके, अभ्यासक्रमानुसार नविन क्रमिक पुस्तके उपलब्ध आहेत. ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन कामाकरिता (library software) लायब्ररी सॉफ्टवेअर वापरण्यात येत असून विद्यार्थ्यांना ऑनलाईन कॅटलॉग (OPAC)चा वापर करुन आवश्यक पुस्तके शोधण्याची सुविधा आहे. याशिवाय वाचन कक्षाची उत्तम व्यवस्था आहे. ग्रंथालय विभागामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**ग्रंथालयामध्ये घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची लिस्ट खालील प्रमाणे :-**

१) ग्रंथालयाची ओळख (Library orientation course)

२) **Dr.S.R.Ranganathan Birthday Celebration (ग्रंथप्रदर्शन)**

३) वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथालयामध्ये १ तास वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

४) महिला सक्षमिकरण या अंतर्गत २५, २६ आणि २७ फेब्रुवारीला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. **(Fancy Dress Compitation, Rangoli Spardha, Dish Decoration.**

५) २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला. या निमित्त काही विद्यार्थ्यांनी बुक रिव्ह्यू (Book Review) तयार करुन आणले तसेच विद्यार्थी, प्राध्यापक, तसेच ज्युनिअर कॉलेजचे स्टुडन्ट ग्रंथालयाचा लाभ घेतात.

# संत तुकारामांच्या परिप्रेक्ष्यातील सामाजिक समता

प्रा.डॉ. अशोक विठ्ठलराव बाहुरबाघ
(प्राध्यापक मराठी विभाग प्रमुख)

प्रस्तावना.

मराठी संत परंपरेत संत तुकारामांचे स्थान अनन्यसाधारण व अद्वितीय आहे. संत ज्ञानेश्वरांनी तत्वज्ञान, नामदेवांनी खरी भक्ती शिकऊन समाजसुधारणा केली तुकारामांनी या सर्वांचा संगम घडवला त्यांनी दारिद्र्य, दुख, शोषण यांचा अनुभव घेतला आणि त्या अनुभवातूनच समाजाला समतेचा धडा दिला. त्यांच्या अभंगात दैनंदिन जीवनातील अनुभव, वास्तव आणि लोकभाषेतील साधेपणा दिसतो. तुकारामांनी जातिभेद, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता याचा तीव्र निषेध करून सर्वामध्ये देव पाहिला आणि समतेचे तत्त्व मांडले. इतर संत जिथे मुख्यत्वे अध्यात्म व भक्तीवर भर देतात, तिथे तुकारामानी सामाजिक वास्तवाशी संवाद साधला. त्यांनी गरीब, शोषित, वंचित घटकांच्या दुःखाला आपल्या भक्तीचे केंद्रस्थान दिले. त्यांच्या अभंगांतून आध्यात्मिकतेसोबत सामाजिक कांतीचे तत्त्वही स्पष्ट दिसते. त्यामुळे संत तुकाराम हे संतपरंपरेतील ''लोकसंत'' म्हणून विशेष वेगळेपण राखतात. समाजातील सामान्य जनतेच्या मनात भक्तीचा दिवा पेटवून, विषमता, अंधश्रद्धा, जातिभेद, अन्याय यांच्या विरोधात त्यांनी आवाज उठविला. अभंग हे त्यांचे मुख्य साधन होते. ''समता'' हीच त्यांच्या जीवनदृष्टीची गाभा स्वरूप होती. पुढील अभंग त्यादृष्टीने उल्लेखनीय आहे. तुकाराम महाराज म्हणतात-

''जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा
देव तेथेचि जाणावा''।

प्रस्तुत अभंगातून तुकारामांचे समतेचे तत्त्वज्ञान स्पष्ट होते. समाजातील दुर्बल, गरीब, शोषित यांच्यातच त्यांनी ईश्वर पाहिला, त्यांचा हा अभंग अत्यंत मर्मभेदी आहे. येथे ते समाजाला नवीन दृष्टी प्रदान करताना दिसतात.

संशोधन उद्दिष्टेः

१. संत तुकारामांच्या अभंगांतील समता विचारांचा सखोल अभ्यास करणे.

२. समतेचे सामाजिक, धार्मिक, नैतिक आणि आध्यात्मिक पैलू स्पष्ट करणे.

३. संत तुकारामांची समता व इतर संतपरंपरेतील विचार यांचा तुलनात्मक संदर्भ पाहणे.

४. आधुनिक समाजात संत तुकारामांच्या समता-विचारांचा उपयोग अधोरेखित करणे.

संशोधनाची गरज :

भारतीय समाजात आजही जातीभेद, स्त्री-पुरुष असमानता, आर्थिक विषमता, धार्मिक तणाव आढळतात. अशा वेळी संत तुकारामांच्या अभंगातील समता हा विषय अभ्यासल्यास सामाजिक एकात्मता, बंधुता आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करण्यास मदत होईल. संशोधन पद्धती हा शोध निबंध गुणात्मक पद्धतीवर आधारित आहे तुकारामांच्या अभंगांचा थेट अभ्यास, वाङ्:मयीन संदर्भ, इतर संताचे विचार, तसेच विद्वानांनी केलेले विश्लेषण यांचा उपयोग करून लेखन केलेले आहे.

विषय प्रवेश :

१) तुकारामांची जीवनभूमिका आणि समतेची प्रेरणाः

तुकारामांचा जन्म गरीब वाणिज्यिक कुटुंबात आला. लहान वयातच आई-वडिलांचे निधन झाले. दुष्काळ, दारिद्रय, उपासमार यांचा त्यांनी अनुभव घेतला. समाजातील खालच्या स्तरातील व्यक्तींवर होणारा अन्याय त्यांच्या डोळ्यांसमोर होता. या अनुभवांनीच त्यांची ममता-दृष्टी घडवली. ते म्हणतात ''दया करणे जे पुत्राशी तेच दास आणि दासी। तुका म्हणे सांगू किती तोची भगवंताची मूर्ती।।'' येथे त्यांना समता अपेक्षित आहे. या अभंगात तुकाराम साधेपणाने सांगतात की, खरा साधू तोच जो दुःखी माणसाला आपला म्हणतो. म्हणजेच देव भक्तीत नाही, तर दीन-दुबळ्यांच्या सेवेत आहे. त्यांच्या या भूमिकेतून समजते की, तुकारामांची समता ही दैनंदिन जीवनातील अनुभवांवर आधारलेली आहे.

२) अभंगांतील सामाजिक समता :

तुकारामांनी समाजातील जातिभेद, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता यांचा तीव्र निषेध केला, त्यांनी प्रत्येक माणूस देवाचा अंश मानला.

''रंकाला ब्रह्म भिकाऱ्याला विष्णु
तुका म्हणे जनातला हरी''

प्रस्तुत अभंगातून स्पष्ट होते की, तुकाराम गरीब, भिकारी, वंचित यांच्यातच देव पाहतात. त्यांनी समाजाला समतेचा धडा शिकवण्यासाठी साध्या, सुगम भाषेत अभंग लिहिले. ''उच्च-नीच भेद न मानता, सर्व माणने एकसमान आहेत'' हे त्यांचे तत्व होते. त्यामुळे त्यांची शिकवण केवळ भक्तीपुरती मर्यादित न राहता सामाजिक सुधारणेचे साधन ठरली.

३) धार्मिक समता :

तुकारामांच्या दृष्टीने देव एकच आहे; म्हणून त्यांनी धर्मामधील भिंती पाडल्या.

''आळस अल्ला राम म्हणे
तरी होये पावन ।।
तुका म्हणे वेद शास्त्रांचा
नको करु निदान'' ।।

येथे तुकारामानी ''राम'' आणि ''अल्ला'' या दोन भिन्न धर्मातील देवतांचा उल्लेख करुन सर्व धर्म सारखे असल्याचे सांगितले. त्यांनी बाह्यकर्मकांड, यज्ञ, पुरोहितशाही यांचा विरोध केला. त्यांच्या मते नामस्मरण हे सर्वांना समान हक्काने करता येते. देव कोणाच्याही जाती-धर्माचा कैदी नाही. खरी भक्ती अंत:करणातील आहे. या विचारातून धार्मिक समतेचे सार्वभौम तत्त्व त्यांनी मांडले.

४) नैतिक व मानवतावादी समता :

तुकारामांनी मानवतेला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या मते दया, करुणा, प्रमाणिकपणा, इतरांना मदत करणे हाच खरा मानव धर्म आहे.

''परि उपकारी ती देवपणासी
तुका म्हणे सच्चा धर्म तोची''।।

उपरोक्त अभंगातून स्पष्ट होते की, देवाला प्रसन्न करण्यापेक्षा मानसाला मदत करणे अधिक महत्वाचे आहे. त्यांनी सांगितले - माणुस जातीनुसार नव्हे तर कर्मानुसार श्रेष्ठ ठरतो. उपकार करणारा, इतरांसाठी जगणारा हाच खरा संत आहे. मानवतेची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. त्यामुळे तुकारामाची समता ही मानवी मुल्यांवर आधारलेली होती.

५) तुकारामांची समता व भारतीय संत परंपरा :

भारतीय संतपरंपरेत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, चोखामेळा, जनाबाई यांसारख्या संतांनी समतेचा विचार मांडला. तुकाराम या परंपरेतील शिखर पुरुष ठरतात.

''एक नारायण सर्वांही ठायीं
तुका म्हणे नाही भेदभाव''।।

बरील अभंगातून तुकाराम स्पष्ट सांगतात की, सर्वत्र एकच परमेश्वर आहे. मग भेदभाव कशासाठी? त्यांची शिकवण वारकरी संप्रदायात सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. जात, धर्म, स्त्री-पुरुष या सर्वांनी समतेने भक्ती केली म्हणूनच तुकारामांचा वारसा हा लोकशाही व मानवाधिकारांच्या पायाशी दडलेला आहे.

६) आधुनिक संदर्भात तुकारामांची समता:

आजच्या काळात समाज अजूनही विषमतेने ग्रस्त आहे. जातीय संघर्ष, धार्मिक तणाव, आर्थिक दरी, स्त्री पुरुष असमानता हे वास्तव आहे. बरे कुणबी केलो नाही तरी दंभेची असतो मेलो। भले केले देवराया नाचे तुका लागे पाया। अशा स्थितीत तुकारामांचा संदेश आजही तितकाच लागू आहे.

''आम्ही जातिहीन आम्ही धर्महीन
तुका म्हणे आम्ही सर्वहीन''।।

येथे तुकाराम स्वतःला जाती-धर्माच्या पलीकडे नेऊन ''मानव'' म्हणून ओळख करून देतात, पुढे ते असे म्हणतात कि, बरे कुणबी केलो नाही तरी दंभेची असतो मेलो, भले केले देवराया। नाचे तुका लागे पाया।। आधुनिक समाजासाठी धडे लोकशाहीतील ''समता, बंधुता, स्वातंत्र्य'' या मुल्यांना बळकटी, धार्मिक सहिष्णुता वाढवणे, वंचित घटकांच्या उन्नतीसाठी प्रेरणा, मानवतेचा सार्वत्रिक संदेश सर्वांना पोहचवणे आहे.

निष्कर्ष :

संत तुकारामांच्या अभंगातील समता ही केवळ सामाजिक किंवा धार्मिक मर्यादेत न बसता **सार्वकालीक व सार्वत्रिक मूल्य** आहे. त्यांनी सर्वसामान्यांना सोप्या भाषेत सांगितले की - देव सर्वत्र आहे. जात, धर्म, पंथ हे कृत्रिम भेद आहेत. दु:खी, गरिब, रंजले-गांजले यांच्या सेवेतच खरा देव आहे. त्यामुळे तुकारामांचा समता विचार हा आजच्या समाजाला मानवी एकोपा व बंधुत्वासाठी मार्गदर्शक ठरतो.

संदर्भ सुची :


१. संत तुकारामांची गाथा - संपादक : पं.विश्वनाथ शास्त्री खरे
२. के. नारायण काले - संत तुकारामांचे तत्वज्ञान
३. प्रा.म.द.आठवले - महाराष्ट्रातील संत परंपरा
४. डॉ. र. ग. भंडारकर - वारकरी संप्रदाय
५. प्रा. राम शिंदे - संत वाङ्मयातील समतेचा विचार
६. डॉ.किशोर सानप, मनोज तायडे - तुकारामाचे व्यक्तितत्व आणि कवित्व

# तुका झालासे कळस

डॉ. एम के फडणीस
(मराठी विभाग)

महाराष्ट्र संतांची परंपरा लाभलेली आहे ज्ञानदेवे रचियेला पाया तुका झालासे कळस या संत बहिणाबाईच्या अभंगाप्रमाणे आपण क्रमशः या परंपरेचा मागवा यापूर्वी मोती पुष्प वार्षिक अंकामधून घेतलेला आहे, आता या लेखात घेणार आहोत. भागवत धर्माची स्थापना संत ज्ञानेश्वरांनी केली संत नामदेवांनी ही धर्म पताका प्रसारामार्फत भारतभर नेली ती कीर्तनपरंपरेतून संत एकनाथांनी तत्त्वज्ञानाचे भक्कम या मंदिराला दिले भागवत धर्माच्या मंदिराच्या कळस म्हणून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज शोभून दिसतात त्यांचे जीवन आपण या लेखातून समजून घेऊयात.

तत्कालीन राजकारणासंबंधी असलेली समर्थाची स्पष्ट होते भाजकाला बौद्धिक समाधान देण्याचे सामर्थ्य समर्थांच्या बाहू पाशात आहे. तात्पर्य तुकाराम व रामदास यांच्या उपदेशांचा विशेष हा की सामाजिक कल्याणाच्या तळमळीतून तो उस्फूर्तपणे बाहेर पडला आहे.

## तुकाराम : तुकारामांचे पारमार्थिक चरित्र :

सामान्य माणसाप्रमाणे तुकोबांचा संसार सुरू होता पुढे त्यांच्यावर आपत्तीचे डोंगर कोसळले व्यापारात दिवाळी निघाल्यामुळे पत गेली दुष्काळात पहिली बायको व लाडका लेक अन्नान्न करीत मृत्युमुखी पडले. या दुःखच दुःख विस्मृतीसाठी तुकारामाने एकांतात जाऊन ज्ञानेश्वर एकनाथ दिकांनी सांगितलेला नामसंकीर्तनाचा मार्ग उचलला. विठ्ठल भक्ती कुटुंबात होतीच अध्यात्म वृत्तीच्या मूळ पींड असलेल्या तुकारामांचे जीवन संसार दुःखाच्या तीव्र तापाने तापून निघाले. काय करावे आता कोणाकडे जावे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला, भाजलेल्या अंतकरणावर श्रध्देचे पाणी शिंपडले जाताच मानसिक भक्ती कवितेतून उमलत गेली. त्या दृष्टीने त्यांची साधक अवस्था महत्त्वाची आहे.

**साधक अवस्था :** साधक दशा ही आत्मिक विकासाची पहिली अवस्था होय. संसाराला अंतरलेल्या या मुमुक्षूला नारायणाशिवाय दुसरा आधार नाही.

भक्ति नवविद्या भावशुध्द करी। अलंकारावरी मुगूटमणि
तुका म्हणे माझी पुरवी वासना। कोण नारायण तुजविण

तुकारामांचे मन व बाह्य जग रात्रंदिवस चालू असलेले 'युद्धाचे प्रसंग' त्यांच्या अभंगात उमटलेले आहेत तुकारामांची वृत्ती निरंतर अंतर्मुख, त्यांचे आत्मपरीक्षण अत्यंत कठोर, भावना अत्यंत

सखोल व डोळस आणि वाणीत एकप्रकारचा परखडपणा, ह्यामुळे अनुभव हेच त्यांचे काव्य होऊन बसले. साधक अवस्थेत तुकारामाने मनाशी काही निर्धार करून ते प्रपंचास विन्मुख व परमार्थ सन्मुख झालेले दिसतात. परमार्थाचा डोंगर दुरून चुकून साजरा दिसला तरीही तो दुर्गम आहे. एकांतवासात तुकारामांच्या, 'तुका म्हणे होय मनाशी संवाद ! आपुल्याचि वाद आपणासी।' करण्यात सुख वाटु लागले. पुढे कीर्तनात रंगून गेलेत.

या साधक अवस्थेत तुकारामांचे मन मधून मधून संसाराकडे ओढले जाई. विषय सुखाचा आस्वाद हवासा वाटे. मोह व अज्ञानाच्या अंधकारातून तुकोबाला स्वप्रयत्नाने मार्ग हुडकून काढावा लागला. त्यांच्या मनाची ही ओढाताण अभंगात उमटलेली दिसते. हा प्रसंग त्यांच्या परमार्थिक चरित्रात आणीबाणीचा होता. काम क्रोधाथिकांचे नियमन त्यांना करायचे होते. या करूण अवस्थेतच स्वप्नात सद्‌गुरुरायाने त्यांच्यावर कृपा केली.

राघवचैतन्य केशवचैतन्य। सांगितली खूण मालिकेची
बाबांनी आपले सांगितले नाम। मंत्र दिला रामकृष्ण हरी
माघ शुध्द दशमी पाहुनी गुरुवार। केला अंगीकार तुका म्हणे

सद्‌गुरु दर्शनाने तुकारामांच्या आत्मिक विकासाचा आशादायी मार्ग सुरू झाला. ते स्वतःला विठ्ठल नामसंकीर्तनात रत ठेवू लागले.

घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे
तुम्ही डोळे घ्यारे सुख। पाहा विठोबांचे मुख
तुम्ही ऐका रे कान। माझ्या विठोबाचे गुण
मना तेथे धाव घेई। राहें विठोबाचे पायी
तुका म्हणे जीवा। नको सोडू या केशवा

परंतु विठ्ठल नामात रंगूनही जागृती व स्वप्न यात त्यांना अनुभवाची एकवाक्यता दिसून येत नव्हती. 'जागृती स्वप्ने पांडुरंग' ऐशी दशा 'कई माझ्या अंगी येईल' ह्याचातुकारामांना ध्यास लागला. साधनेला फळ मिळवण्यासाठी ते विठ्ठलाची करुणा भाकायला लागले. 'कन्या सासुरासी जाये, मागे परतूनी पाहे' अशी त्यांची अवस्था होऊन पांडुरंगाच्या दर्शनासाठी 'जीवनावेगळ्या मासोळी' प्रमाणे तळमळू लागले. देवदर्शन होत नाही म्हणून ते निराश झाले.

**आत्मिक सत्र** :- प्रपंच व परमार्थ या दोहोंसही आपण अंतरलो की काय, या भावनेने ते अधीकच निराश झालेत. वैतागून ते देवास बोल लावू लागले.

कशासाठी आम्ही जाळिला संसार। न करा हा विचार ऐसा देवा

कैसे नेणो तुम्हा करवते उदास। माझा प्रेमरस भंगावया

एवढ्यानेही देवदर्शन न झाल्याने तुकोबा देवळाच 'निष्ठा जरा, चोरटा शिंदळ' इ. शिव्यांची लाखोळी वाहू लागले.

जरी मी नव्हतों पतीत । तरी तू पावन कैचा येथ

म्हणोनि माझे नाम आधी। मग तू पावन कृपानिधी

असा धाकही ते परमेश्वरास दाखवितात. 'देव मेला' असेही ते म्हणू लागले. देवा मला तुमचे मोक्षाचे भातुके नको, मला पाहिजे ते तुम्ही आणि तुम्हीच' असे ते देवाची करुणा भाकायला लागले. 'तुका म्हणे भेटी। पुरे एकची शेवटी' ही तुकारामांच्या परमार्थ जीवनातील आत्मिक रात्र होय.

**आत्मसाक्षात्कार :-** तुकारामांच्या सत्वपरीक्षेची ही अवस्था होय. स्वतःच्या प्राणांपेक्षाही प्रिय असलेल्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्या गेल्या. आपले कवित्व अपमानित झाले हे पाहून त्यांना अतिव दुःख झाले. तेरा दिवस त्यांनी निष्चक्र उपवास करून परमेश्वराला साकडे घातले. श्री विठ्ठलाचे नामस्मरण करीत दिवस आणि रात्र ते पडून राहिले. 'तुका म्हणे आता मांडीयेले निर्वाण, प्राण हा सांडिन तुजवरी' असा शेवटचा निर्धार त्यांनी केल विठ्ठलाची बाहुली पाहता त्यांचे डोळे थिजले. तुकारामांच्या आध्यात्मिक जीवनातील अंधार रात्र संपुन नवा जागृतीचा दिवस उजाडला आणि अखेरीस देवाच्या सुकोमल स्वरूपाचे त्यांना दर्शन झाले व तुका धन्य झाला. आत्मसाक्षात्काराची ही अनुभूती शाब्दिक कारुण्य तुकोबांचे श्रेष्ठत्वाची कल्पना येते. 'आजी आनंदुरे आजी आनंदुरे' अशी त्यांची मनोवस्था त्यांच्या अभंगातून दिसून येते. तुकारामांचा जीवात्मा शिवात्म्याच्या ठिकाणी सागराला जशी एकरूप व्हावी त्याप्रमाणे मिळून गेला. लौकिकदृष्ट्या त्यांचे व्यवहार असले तरी तुका उठला नव्हता.

आपुले मरण पाहिले म्या डोळा

तो जाहला सोहळा अनुपम ।

असे तुकाराम म्हणतात ते याच अर्थाने. स्वोध्दारानंतर तुकारामांना विश्व संसाराची चिंता लागून राहिली, तुका आता उपकारापुरता उरला, 'अधिकार तैसा करू उपदेश' ही त्यांची जीवननिष्ठा झाली. तुकारामांना माती व मोती समान झालेत. शिवरायांनी पाठविलेली संपत्ती त्यांनी परत पाठविली व शिवरायास प्रासंगिक उपदेशही केला.

परीक्षावे कोण राज्याचे रक्षक। विवेकाविवेक पाहोनियां

सांगणे न लगे सर्वज्ञ तू राजा। अनाथांच्या काजा साह्य व्हावे

वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा हा आत्मविश्वास तुकोबांना आला. तुकारामांच्या काळी अधर्म, अनिती व अज्ञान यांचा पसारा वाढत होता. त्यासाठी त्यांनी तीक्ष्ण उत्तराचे बाण समाजावर सोडले. हे त्यांचे सामाजिक उद्‌बोधनच होय. शेवटचा दिवस गोड झाल्यानंतर ते देवाज्ञा हेच दान देगा देवा तुझा विसर न व्हावा, एवढेच मागणे मागतात.

**पाखांड खंडन** :- तुकारामांनी आपल्या अभंगात तत्कालीन सामाजिक स्थितीचे चित्र रेखाटले आहे. वेदांशी विपरीत असे वर्णन जे त्यावेळी पडत होते. त्याच्यावर त्यांनी प्रखर हल्ला चढविला. कलियुगातील धर्माचे वाटोळे पाहून त्यांच्या अंतःकरणाला वेदना झाल्या. परोपरी ब्रह्मज्ञान झाल्याचा आव आणणारे पण मनात मात्र कालक्रूर असलेले दांभिक त्यांना समाजात दिसलेच नाही, तर त्यांचा साधकावस्थेत तुकारामांना उपद्रवही झाला. 'वेदांचे पालक झोपेतील मद्य । न देहाती भेद विषयी भांड' अशांची फजिती करण्यास तुकारामांची वाणी कतरली नाही. यावनी आक्रमणामुळे ब्राह्मणवर्ग रामनामा ऐवजी 'दोमदोम' करायला लागला. शिवाय समाजात शुद्र अशा क्षेत्र देवतांचे स्तोम खूप माजले होते. त्यांना नाकारून तुकोबांनी प्रत्येकाच्या हृदयात देवाचाही देव असलेला पंडरीशयाची स्थापना केली. हे करीत असताना तुकोबांना पाखंडाची मते खोडून काढावी लागली, समाजाला लुटणाऱ्या ढोंगी साधुंचा समाचार त्यांनी तीक्ष्ण शब्दांनी घेतला आहे.

जगी कीर्ती व्हावी । म्हणोनि झालासी गोसावी
तुका म्हणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविजी नाचा

किंवा

होऊनि संन्यासी भगवी लुगडी। वासना न सोडी विषयाची
निंदिती करान्न इच्छिति देवान्ना पाहताती मान आदराचा
तुका म्हणे ऐसे दांभिक भजन। तया जनार्दन भेटे केवी

अशा तीव्र शब्दात तुकारामांनी त्यांची निर्भत्सना केली. तुकोबाच्या वेळी पंथा पंथाचा बाजार माजला होता. त्या लोकांची भक्ती 'मोले घातले रडाया। नाही आसू आणि माया' अशी होती, अशांना अज्ञानाच्या भक्तीने पांडुरंगाचे दर्शन होत नाही हे स्पष्ट बजावून सांगितले. 'दाढी डोई मुंडी कुकुनिया सर्व' कोणी सन्यासी होवु शकत नाही. चुकीच्या मार्गावरील नाथ, जंगम यांनाही तुकोबांच्या कठोर वाणीने झोडपून काढले. 'कान फाडून मुद्रा घालणाऱ्या नाथांना शंकराची ओळखच पटली नाही', अशांना तुकोबा नर्काचा मार्ग दाखवितात. आणि विभूती करून जंगम होणाऱ्यांना शिवभक्तीची चाड

नाही, तर ते संसाराचा व्यापार करतात आहे. एकंदर खल-मुर्जनप्रवृत्तीचे लोक, अज्ञानातच पोपटपंची करणारे, आचारभ्रष्ट व दांभिकांना तुकोबाच्या वाणीने 'नाठाळाचे माथा काठी' या न्यायाने झोडपले आहे.

तुकारामांची वाणी क्वचित प्रसंगी शिवराळ होऊन शिव्याशापही देते, हा आरोप त्यांच्या वाणीवर केला जातो. परंतु रामदास डांगेच्या मते, ज्या समाजात सौम्यपणाने सांगून गेली कित्येक शतके काहीही फरक पडला नव्हता अशा समाजाला फटकारेच हवे होते असे म्हणावे लागते. तुकोबारायांच्या पाखांडखंडानातून समाजाचे त्यांनी केलेले सूक्ष्म अवलोकनही लक्षात येते. शेवटी आपल्या कठोर वाणीबद्दल कोणी रागावू नये, असेही ते नम्रपणे म्हणतात.

**तुकारामांची शिकवण :-** तुकारामांनी केवळ पाखंड खंडन न करता धर्मपालनासाठी उपदेशही केला आहे. धर्मनितीचे संकेत पाळणाऱ्या आदर्श पुरुषाची लक्षणे तपशीलवार वर्णन केली आहेत. 'धर्म रक्षावयासाठी करणे आटी आम्हासी। वाचा बोली वेदनातील। करू संती केले ते' या त्यांच्या अभंग उद्‌गारावरून पूर्व संतांचाच मार्ग आचरण्यास तुकाराम सांगतात आहे. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असे सांगणाऱ्या तुकारामांच्या कृतीत आणि उक्तीत अंतर आढळत नव्हते. नामसंकीर्तनाचा सुलभ मार्ग त्यांनी बहुजन समाजास देऊन याचाच प्रचारही केला. देव भावाचा किंवा भक्तीचा भुकेला आहे. जोपर्यंत अंतरंग शुद्ध नाही तोपर्यंत कितीही पाठांतर केले तरी परमेश्वर प्राप्ती होणे दुरापास्त आहे आणि म्हणूनच अहंतेचा त्याग करून पंढरीरायावर 'निष्ठावंत भाव' ठेवला पाहिजे. आध्यात्मिक वाटेवर चालणाऱ्यांना 'भावचि कारण भावचि कारण मोक्षाचे साधन बोलियेले' असा उपदेश त्यांनी केला. अकिर्ती व निंद्यकर्म सोडून सत्याची कास धरावी असे ते कळवळ्यांने सांगतात.

कारण -

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ
आईका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा
कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचे
तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे.

आत्मसामात्कार झाल्यावर 'आपुल्या सारिखे' इतरास करून समाजोध्दार करावयावा असतो असे ते म्हणतात.

या नरदेहाचा दुरुपयोग करणाऱ्या नतद्रष्टांवर त्यांनी तोंडसुख घेवुन त्यांनाही परमेश्वर भक्तीचा उपदेश केला आहे. 'मुखी नाम हाती मोक्ष' हाती पडत असल्यामुळे नामापरते साधन नाही. संत

सहवास व परमेश्वराचे सतत स्मरण हा दुहेरी उपदेश तुकारामांनी केला आहे. काम क्रोधादी विकारांपासून दूर राहावे. अहंकार व दंभ साधकाने दूर राहावे, ते ईश्वराच्या भजनाच्या आड येणारे आहेत. संसारात स्त्री व उपकारक होतात. मग धन उत्तम व्यवहाराने मिळविलेले असावे व स्त्रीलंपटता नसावी पाण्यातील कमळाप्रमाणे संसारात अलिप्त राहावे, हा तुकोबांनी संसारीजनांना उपदेश केला. यश, किर्ती, मान प्रत्येकाने मिळवावे, कारण मरणोत्तर याच गोष्टी शिल्लक राहतात. तिचे नाव भूतांचे पालन, आणिक विदार्ळण कंटकांते' ही त्यांची दयेची व्यख्या पाहिली म्हणजे तुकाबांच्या भूमिकेचे यथार्थ ज्ञान होते. अभ्यास व स्वप्रयत्नांचा महिमा सांगून तुकारामांनी आदर्श पुरुषांची लक्षणे सांगितली आहेत. संत आणि सामान्यजन या दोघांतही तुकाराम महाराज भेद मानतात.

पृथ्वीच्या पोटी ही गारगोटी। दोहोंसी संसारी करू नये
तुका म्हणे तैसा संत आणि जन । दोहांसी समान भजू नये

सामान्यजणांपेक्षा संत कसा वेगळा आहे हे तर रंजल्या गांजल्यांना जो आपले म्हणून प्रेम देतो तोच संत होय, नव्हे तो भगवंताचीच मूर्ती होय, अशी तुकारामांची शिकवण होय.

जे कां रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा
मृदू सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त
ज्यासि आंपगिता नाही। त्यासी धरी जो हृदयी
दया करणे जे पुत्रासी । तोची दासा आणि दासी
तुका म्हणजे सांगू किती। तोची भगवंताची मूर्ती

संतसहवासाने सगळे पावन होतात, म्हणून संत सहवास हा आवश्यकच होय. शेवटी प्रारब्धात जे असेल ते होईलच.

प्रारब्धे चि जोडे घन। प्रारब्धे चि वाढे मान
प्रारब्धे चि होय सुख। प्रारब्धे चि पावे दुःख
प्रारब्धे चि भरे पोट। तुका करिना बोभाटा,

प्रारब्धात जरी काहीही असले तरी जीवन शूरासारखे जगावे हा संदेशही द्यायला तुकाराम विसरत नाही. त्या दृष्टीने त्यांचे पाईकेचे अभंग लक्षणीय आहेत.

पाईकपणे जोतीला सिध्दांत। शूर घरी मान वचन चित्ती
पाईकावाचून नव्हे कधी सुख। प्रजांमध्ये सुख न सरे पीडा

तुका म्हणे एका क्षणाचा करार। पाईक अपार सुख भोगी

तुकारामांनी प्रत्यक्षपणे समर्थांसारखा राजकारणात भाग जरी घेतला नसला तरी त्यावेळच्या वातावरणाला उपयुक्त असे शूरवीर निर्माण करण्याचे कार्य असे पाईकाच्या अभंगातून अप्रत्यक्षपणे केले आहे हे नाकारता येत नाही.

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज, पिंजर
## सत्र २०२५-२६
## मराठी विभागाचा निकाल

| क्र. | वर्ग | विषय | विद्यार्थी | पास | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | B.A.I (Sem II) | मराठी (639202) | 51 | 40 | 78.45% |
| | | मराठी साहित्य | 05 | 04 | 80% |
| २ | B.A.II (Sem IV) | मराठी (639205) | 75 | 50 | 66.67% |
| | | मराठी साहित्य | 12 | 08 | 66.67% |
| ३ | B.A.III (Sem VI) | मराठी | 71 | 67 | 94.37% |
| | | मराठी साहित्य | 10 | 10 | 100% |

**मराठी विभागाचे अंतर्गत खालील तीन उपक्रम राबविले गेले.**

१) दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने एक दिवसीय सेमिनारचे आयोजन.

विषय : आईबाबा या विषयावर स्वरचित कविता

२) दिनांक २४ मार्च २०२६ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन.

विषय : शिष्यवृत्ती

३) दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी वंदे मातरम गीतावरील प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी योगसाधनेचे महत्व

Dr.Nanasaheb Bhanudas Sapkal
Physical Director, Department of Physical Education
Bhausaheb Labane Dnyanprakash Arts College, Pinjar
Affiliation: Sant Gadage Baba Amravati University, Amravati, Maharashtra
Email: nanasahebsapkal1968@gmail.com
Mobile: +91 9975969851

**सारांश (Abstract)**

मानवी जीवनातील यश व प्रगतीसाठी स्मरणशक्ती ही एक मूलभूत क्षमता आहे. आजच्या स्पर्धात्मक व तणावग्रस्त जीवनशैलीमुळे विस्मरण, एकाग्रतेचा अभाव व मानसिक थकवा वाढला आहे. या पार्श्वभूमीवर योगसाधना हा स्मरणशक्ती वाढविण्यासाठी एक नैसर्गिक व परिणामकारक मार्ग मानला जातो. या संशोधनात योगातील आसन, प्राणायाम व ध्यान यांचा स्मरणशक्तीवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला. निष्कर्षानुसार नियमित योगाभ्यासामुळे मानसिक स्थैर्य, एकाग्रता, तणाव नियंत्रण व स्मरणशक्ती वृद्धिंगत होते.

## प्रस्तावना (Introduction)

स्मरणशक्ती ही मानवी बुद्धीची एक महत्वाची देणगी आहे. शिक्षण, विज्ञान, व्यवसाय, कला, सामाजिक व सांस्कृतिक जीवन या सर्वच क्षेत्रांत स्मरणशक्तीचे स्थान महत्त्वाचे आहे. परंतु आजच्या आधुनिक जीवनशैलीत चुकीच्या आहारपद्धती, झोपेचा अभाव, मानसिक ताणतणाव यामुळे स्मरणशक्ती कमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. भारतीय योगशास्त्रात शरीर, मन व बुद्धी यांच्या संतुलनासाठी विविध साधनांचा उल्लेख आढळतो.

## संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)

१. स्मरणशक्ती कमी होण्याची कारणे शोधणे.
२. योगसाधनेचा स्मरणशक्तीवर होणारा परिणाम तपासणे.
३. विद्यार्थ्यांना व सर्वसामान्यांना योगाभ्यासाचे मार्गदर्शन करणे.

## संशोधन पद्धती (Methodology)

साहित्य सर्वेक्षणः योग व स्मरणशक्तीवरील प्राचीन व आधुनिक संशोधनाचा अभ्यास,

प्रायोगिक पद्धतः

गट : ५० विद्यार्थी (२५ योगाभ्यास करणारे व २५ न करणारे).

कालावधी : ८ आठवडे.

सराव : प्राणायाम (अनुलोम-विलोम, कपालभाती),ध्यान,वज्रासन,सर्वांगासन, शिर्वासन इत्यादी आसने, साधने : लघुकाळ व दीर्घकाळ स्मरण चाचण्या.

**निष्कर्ष (Findings)**

१. योगाभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची एकाग्रता ३०% ने वाढली.

२. ध्यानामुळे ताणतणाव ४०% ने घटला.

३. प्राणायाम व आसनांचा सराव करणाऱ्यांची दीर्घकालीन स्मरणशक्ती सुधारली.

४. योगाभ्यास न करणाऱ्या गटात विशेष बदल दिसून आला नाही.

**चर्चा (Discussion)**

योगाभ्यासामुळे मेंदूला मुबलक रक्तप्रवाह मिळतो, प्राणवायूची उपलब्धता वाढते आणि तणाव कमी होतो. ध्यानामुळे मन स्थिर होते व एकाग्रता वृद्धिंगत होते.

**उपसंहार (Conclusion)**

स्मरणशक्ती वृद्धिंगत करण्यासाठी योगसाधना ही वैज्ञानिक व उपयुक्त पद्धत आहे. नियमित आसन, प्राणायाम व ध्यानाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, नोकरदारांना तसेच सर्वसामान्यांना स्मरणशक्ती वाढविण्यात मदत होते.

**शिफारसी (Recommendations)**

१. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात योगशिक्षणाचा समावेश करावा.

२. विद्यार्थी व नोकरदारांनी दररोज किमान ३० मिनिटे योगाभ्यास करावा.

३. तणावग्रस्त व्यक्तींनी ध्यान व प्राणायामाचा नियमित सराव करावा.

**संदर्भसूची (References)**

१. अय्यंगार, बी. के. एस. (2005). लाईट ऑन योगा, लंडनः थॉर्सन्स.

२. सरस्वती, स्वामी सत्यानंद. (2013). आसन, प्राणायाम, मुद्रा, बंध (चौथे संस्करण), बिहारः योग पब्लिकेशन ट्रस्ट.

३. स्वामी विवेकानंद योग संशोधन संस्था.(2020) योग व स्मरणशक्तीवरील संशोधन अध्ययन, बंगलोर : एस.व्ही.वाय.ए.एस.ए. विद्यापीठ.

४. World Health Organization. (2023). Mind and memory : The role of lifestyle in cognitive health. Geneva : WHO.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर व्दारा संचालीत

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस कॉलेज, पिंजर जि. अकोला

### आंतर महाविद्यालयीन २०२५-२६ सहभाग

| अ.क्र. | खेळाचे नांव | सहभाग |
|---|---|---|
| १. | क्रॉस कंट्री | सहभाग |
| २. | अथेलेटीक्स | सहभाग |
| ३. | योगा | सहभाग |
| ४. | बॅडमिंटन | सहभाग |

## शारीरिक संचालक या नात्याने विविध उपक्रमात सहभाग नोंदविला
## डॉ. नानासाहेब भा. सपकाळ

१. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

२. बृहण महाराष्ट्र योग असोशीयन अध्यक्ष अकोला जिल्हा

३. महाराष्ट्र योग शिक्षक महासंघ उपाध्यक्ष

४. आस्था योग फाउंडेशन महासचिव अकोला जिल्हा

५. पतंजली योग शिक्षक

६. संमित्र बँक संचालक अकोला

७. बॉक्सिंग मैनेजर भटिंडा पंजाब

८. कोटा विद्यापीठ बॅडमिंटन मैनेजर

९. काश्मीर विद्यापीठ मैनेजर पॉवर लिफ्टिंग

१०. क्रॉस कंट्री मॅनेजर (मंगलूर)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विद्यार्थ्यांना शैक्षणिक सल्ला

प्रा.सुनील मदन मनवर
(इतिहास विभाग प्रमुख)

आजच्या आधुनिक, वेगवान आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसमोर प्रचंड संधी उपलब्ध आहेत, परंतु त्याचबरोबर गोंधळ, दिशाहीनता आणि तणावही वाढताना दिसतो. एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणे ही माझी जबाबदारी आहे, आणि ही जबाबदारी पार पाडताना मला नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मार्गदर्शक ठरतात. त्यांचे जीवन, त्यांचा संघर्ष, आणि शिक्षणाबद्दलची त्यांची निष्ठा हे प्रत्येक विद्यार्थ्याने समजून घेतले पाहिजे.

डॉ. आंबेडकर यांचे संपूर्ण जीवन हे शिक्षणाच्या शक्तीचे जिवंत उदाहरण आहे. अत्यंत प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत जन्म असूनही त्यांनी शिक्षणाच्या जोरावर स्वतःचे आणि समाजाचे भवितव्य बदलले. त्यांनी विद्यार्थ्यांना दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. एक शिक्षक म्हणून मी विद्यार्थ्यांना सांगतो की, हा संदेश केवळ घोषवाक्य म्हणून न पाहता तो आपल्या दैनंदिन जीवनात उतरवला पाहिजे.

शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा पास होणे किंवा चांगले गुण मिळवणे नव्हे. शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता विकसित करणे, योग्य-अयोग्य यातील फरक समजणे आणि स्वतःचे मत मांडण्याची ताकद निर्माण करणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहमीच विवेक, तर्क आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यावर भर दिला. त्यांनी अंधश्रद्धा आणि रूढीपरंपरांचा विरोध केला आणि विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची सवय लावण्याचे आवाहन केले.

आजच्या काळात विद्यार्थ्यांसमोर मोबाईल, सोशल मीडिया आणि इंटरनेट यांचा मोठा प्रभाव आहे. ही साधने ज्ञान मिळवण्यासाठी उपयुक्त असली, तरी त्यांचा चुकीचा वापर विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित करू शकतो. त्यामुळे एक शिक्षक म्हणून मी विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन शिकण्याचा सल्ला देतो. डॉ. आंबेडकर यांनीही वेळेचे महत्त्व अधोरेखित केले होते. त्यांनी स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा उपयोग अभ्यास आणि आत्मविकासासाठी केला.

विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात एक स्पष्ट ध्येय निश्चित केले पाहिजे. ध्येय नसलेला विद्यार्थी हा दिशाहीन होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे की, 'जीवनात मोठे ध्येय ठेवा आणि त्यासाठी झटत राहा.' हे ध्येय गाठण्यासाठी सातत्य, परिश्रम आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. अपयश आले तरी निराश न होता त्यातून शिकून पुढे जाणे हीच खरी प्रगती आहे.

डॉ. आंबेडकर यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अनेक ठोस उपाययोजना केल्या. त्यांनी स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही संस्था आजही हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी

देत आहे. त्यांनी वसतिगृहे, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या या कार्यामुळे अनेक बंचित घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली.

त्यांच्या काळातील मूकनायक आणि बहिष्कृत भारत या वर्तमानपत्रांद्वारे त्यांनी समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव दिली. एक शिक्षक म्हणून मला वाटते की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकांमध्ये मर्यादित न राहता समाजातील घडामोडी समजून घेतल्या पाहिजेत.

डॉ. आंबेडकर यांचा विद्यार्थ्यांसाठीचा एक महत्त्वाचा संदेश म्हणजे स्वाभिमान. त्यांनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत स्वतःचा स्वाभिमान जपला पाहिजे. स्वतःवर विश्वास ठेवणे आणि आपल्या क्षमतेवर श्रद्धा ठेवणे हे यशाचे मूलभूत घटक आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक विद्यार्थी इतरांशी तुलना करून निराश होतात, पण त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक व्यक्ती वेगळी आहे आणि प्रत्येकाची प्रगतीची गती वेगळी असते.

एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मला असे वाटते की, शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून समाजाच्या उन्नतीसाठीही असले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. त्यांनी सांगितले की, शिक्षित व्यक्तीने समाजासाठी काम केले पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे.

विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. नियमित अभ्यास, वेळेवर झोप, आरोग्याची काळजी आणि सकारात्मक विचार या गोष्टी यशस्वी आयुष्याची पायाभरणी करतात. डॉ. आंबेडकर यांनी स्वतःच्या आयुष्यात शिस्त आणि नियोजन याला खूप महत्त्व दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही शिस्तबद्ध जीवनशैली स्वीकारली पाहिजे.

आजच्या काळात शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, परंतु त्याचा योग्य उपयोग करणे विद्यार्थ्यांच्या हातात आहे. एक शिक्षक म्हणून मला असे वाटते की, विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून सतत प्रयत्न केले पाहिजेत. अपयश आले तरी हार न मानता पुढे जाणे हीच खरी जिद्द आहे.

शेवटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहेत. त्यांच्या विचारांचे अनुसरण केल्यास विद्यार्थी केवळ शैक्षणिक यशच्च मिळवणार नाहीत, तर ते एक जबाबदार, सजग आणि संवेदनशील नागरिकही बनतील शिक्षण, परिश्रम, आत्मविश्वास आणि स्वाभिमान यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठल येते, हे त्यांच्या जीवनातून स्पष्ट होते.

## संदर्भसूची

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. (1936). जातिभेदाचा विनाश (Annihilation of Caste). स्वयंप्रकाशित.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. (1945). काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांवर काय केले. मुंबई : थॅकर अँड कंपनी.

३. भारत सरकार. (2014). डॉ. बाबासाहेब आंबेडकरः लेखन आणि भाषणे (खंड 1 ते 17). नवी दिल्ली : डॉ. आंबेडकर फाउंडेशन.

४. पीपल्स एज्युकेशन सोसायटी. (1945). वार्षिक अहवाल. मुंबई.

५. मूकनायक. (1920). निवडक संपादकीय लेख. मुंबई.

६. बहिष्कृत भारत. (1927). संकलित अंक. मुंबई..

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ अमरावती संलग्नित

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर द्वारा संचालित

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट कॉलेज, पिंजर जि. अकोला

नॅक द्वारा पुनर्मानांकित ग्रेड बी महाविद्यालय

राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल

०१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६

सत्र २०२५-२६

प्रस्तावनाः शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत भाऊसाहेब लहाने आर्टस कॉलेज पिंजर यांनी विद्यार्थ्यांच्या सार्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणीक, सांस्कृतीक, सामाजीक, स्वच्छता अभियान, मतदार जनजागृती, बेटी बचावो बेटी पढ़ाओ, अंधश्रध्दा निर्मूलन, संविधान जनजागृती ईत्यादी उपक्रमाद्वारा सामाजीक जागृती व विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानवृध्दी, कौशल्यविकास, सामाजीक जाणीव याचा विकास करण्यात आला.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती: १४ एप्रिल २०२५ महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.
- एक झाड आई करिता : या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयामध्ये एक झाड आई करिता हा उपक्रम राबविण्यात आला.दि.१६/०६/२०२५ ला सर्व विद्यार्थ्यांनी एक झाड आई करता लावण्यात आले.
- योग दिन : २१ जुन २०२५ ला महाविद्यालयामध्ये योगदिनाचे धडे देण्याकरीता डॉ. एन. बी. सपकाळ व डॉ. आर.एन. गावंडे यांनी योगाचे शिक्षण दिले.
- भाऊसाहेब लहाने यांबवी जयंती: २२ जुन २०२५ ला महाविद्यालयामध्ये भाऊसाहेब लहाने यांची जयंती रोगनिदान शिबीर घेवून साजरी करण्यात आली.
- छत्रपती शाहू महाराज यांची जयंती: महाविद्यालयामध्ये २६ जुन २०२५ ला सामाजीक समतेचा संदेश देणाऱ्या शाहू महाराज यांच्या जिवनावर आधारीत भाषण स्पर्धा घेण्यात आली.
- नशामुक्त भारत पंधरवाडा दि. १२ जुन ते २६ जुन २०२५ भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शन खाली व यु.जि.सी. नवी दिल्ली यांच्या सुचनेनूसार दि. १२ जुन ते २६ जुन २०२५ दरम्यान नशामुक्त भारत पंधरवाडा या विशेष अभियानाचे भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस कॉलेज पिंजर येथे करण्यात आले.
- लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती : ०१ ऑगष्ट २०२५ ला महाविद्यालयामध्ये लोकमान्य तिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती यांच्या जिवनावर आधारीत भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भागघेवून कार्यक्रम करण्यात आला.
- स्वातंत्र्य दिन साजरा : महाविद्यालयामध्ये १५ ऑगष्ट २०२५ ला स्वातंत्र दिन साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि. सी. खारोडे सर यांनी

विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

* शिक्षक दिन :- महाविद्यालयामध्ये ०५ सप्टेंबर २०२५ ला शिक्षक दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्हि. सी. खारोडे सर होते व भाषण स्पर्धा ठेवून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेवून उत्कृष्ट भाषणे दिली.
* रक्तदान श्रेष्ठदान श्लोगण व पोस्टर स्पर्धा उपरोक्त कार्यक्रमाचा भाग म्हणून पहिल्या दिवशी रक्तदान श्रेष्ठदान या विषयावर श्लोगण व पोस्टर स्पर्धेचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले.
* स्वच्छता अभियानः दि. १८ सप्टेंबर २०२५ ला स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महाविद्यालय परीसरात प्राचार्य डॉ. व्हि.सी, खारोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गांजर गवत निर्मूलन व परीसर स्वच्छता केली व कार्यक्रमाची सांगता एन.एस.एस. अधिकारी प्रा. सुनिल मनवर यांनी विद्यार्थ्यांना बिस्कीटे व केळी देवून कार्यक्रमाची सांगता केली.
* आरोग्य तपासणी शिबीर दि. १९ सप्टेंबर २०२५ ला आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबीन व आरोग्य तपासणी करण्यात आली त्याकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र पिंजर येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. दिपक पांडे व डॉ. करवते स्वतः उपस्थित होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांची या आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.
* स्वच्छता रॅली: दि. २० सप्टेंबर २०२५ ला स्वच्छता रॅली काढण्यात आली या रॅली द्वारे पिंजर गावातील रस्ता, धार्मिक स्थळे स्वच्छ करण्यात आले. प्राचार्य डॉ व्हि. सी. खारोडे यांनी रॅलीचे फित कापून उद्घाटन केले. महाविद्यालयापासून पिंजर गावातील गाडगे महाराज पुतळ्यापर्यंत ही रॅली काढण्यात आली त्या करीता एन.एस.एस. अधिकारी प्रा. सुनिल मनवर यांनी शिस्तबध्द रॅलीचे आयोजन केले. रॅली मध्ये बहुसंख्यने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले.
* संविधानाची पंचाहत्तरी: दि. २२ सप्टेंबर २०२५ ला महाविद्यालयामध्ये संविधानाची पंचाहत्तरी या विषयावर व्याख्यान आयोजीत केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिध्देश्वर खोबरे यांनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. तृप्ती भेंडकर हिने केले.
* सरदार वल्लभभाई पटेल जयंती: महाविद्यालयामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली.
* राष्ट्रीय सेवा योजना दिन : महाविद्यालयामध्ये दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्हि. सी. खारोडे प्रमुख पाहूणे डॉ. नानासाहेब सपकाळ हे होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनिल मनवर यांनी केले व सुत्रसंचालन प्राची इंगळे तर आभार तृप्ती भेंडकर हिने मानले.
* पंडीत दीनदयाल उपाध्याय जयंती : दि. २५ सप्टेंबर २०२५ महाविद्यालयामध्ये पंडीत दीनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते

म्हणून दैनिक तरुण भारताचे जेष्ठ पत्रकार महेंद्रजी कविश्वर हे होते. त्यांनी पंडीत दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ. वाहूरवाध सर यांनी केले व आभार प्रा. सुनिल मनवर यांनी मानले.

* जागतीक पर्यावरण दिन महाविद्यालयामध्ये दि. २६ सप्टेंबर २०२५ ला जागकीत पर्यावरण दिन आयोजीत करुन त्यावर आधारीत चित्रफित विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरवर दाखविण्यात आले. या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.
* छत्रपती शिवाजी महाराज: दि. २७ सप्टेंबर २०२५ ला महाविद्यालयात विश्वपर्यटन दिन म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची ओळख होण्यासाठी शिवाजी महाराज यांची आग्रा भेट, कैद व सुटका या विषयावर चित्रफित दाखवण्यात आली.
* विर भगतसिंग यांची जयंती: महाविद्यालयामध्ये दि. २८ सप्टेंबर २०२५ ला विर भगतसिंग जयंती साजरी करण्यात आली.
* योगाचे निरोगी जिवनासाठी महत्व: महाविद्यालामध्ये दि. २९ सप्टेंबर २०२५ ला योगाचे निरोगी जिवनासाठी महत्व या विषयावर व्याख्यान व प्रात्याक्षिक कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. व्हि.सी. खारोडे सर व योग अभ्यासक डॉ. सुबोध तायडे व डॉ. सुनंदाताई तायडे यांनी योग्यमार्गदर्शन करून प्रात्याक्षिक दाखवून योग शिक्षण दिले.
* वृक्षदान कार्यक्रम : महाविद्यालयामध्ये दि. ३० सप्टेंबर २०२५ वृक्षदान कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालाचे वरीष्ठ लिपीक श्री संतोष गिरी यांनी परिश्रमाने तयार केलेले ५० पारीजात वृक्ष विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले.
* डिझास्टर रिलीफ फंड रॅली महाविद्यालयात १ ऑक्टोंबर २०२५ ला डिझास्टर रिलीफ फंड रॅली पिंजर परीसरात काढण्यात आली. मराठवाड्यातील अभूतपुर्व अशा पुर परीस्थतीमुळे तेथील नागरीकांचे, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पाहता माणूसकीचे नविन आयाम निर्माण करु या सरळ हाताने मदत करूया या नात्याने पिंजर शहरामध्ये महाविद्यालयाच्या वतिने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रॅली काढली व मुख्यमंत्री सहाय्यता निधीला २१०० रुपयाचा चेक देण्यात आला.
* महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती: महाविद्यालायामध्ये दि. ०२ ऑक्टोंबर २०२५ रोजी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतीमेचे पुजन करुन जयंती साजरी करण्यात आली व कार्यक्रमाची सांगता वृक्ष लागवड करून करण्यात आली.
* ७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदेमातरम' या गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहे. सर्व जनमानसात देश भावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावली म्हणून तालुक्याच्या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष, भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज पिंजरचे प्राचार्य डॉ.व्ही सी खारोडे, गुलाब नबी आझाद महाविद्यालयाचे प्रा देशपांडे प्रा. धनराज खिराडे, पिंजर कॉलेजचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनील मनवर दोन्ही

महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षिकेतर कर्मचारी यांनी सकाळी १०:३० वाजता अतिशय सुंदर 'वंदेमातरम समूह गायन केले. गुलाब नबी महाविद्यालयाचे श्री गायकवाड सर यांनी सूत्रसंचालन केले, तर पिंजर कॉलेज कार्यक्रम अधिकारी प्रा. मनावर सर यांनी आभार मानले.

- ६ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात डी. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.
- २० डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्ही सी खारोडे व प्रमुख पाहुणे डॉ. एम के फडणीस आणि हॉ. पंकज तायडे सर होते गाडगेबाबांच्या जीवनावर भाषण स्पर्धा घेण्यात आली.
- २६ डिसेंबर २०२५ रोजी 'चीरबाल दिवस' शिखांचे दहावे गुरु गुरु गोविंद सिंह यांच्या दोन लहान पुत्राच्या साहेबजादा जोरावर सिंग आणि साहेबजादा फतेहसिंह धर्मासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून साजरा केला
- ३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.
- १२ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६ पर्यंत राष्ट्रीय युवक सप्ताह उपक्रम घेण्यात आला असून या सप्ताहामध्ये १२ जानेवारी २०२६ ला स्वामी विवेकानंद यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. रन फॉर स्वदेशी तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्रावर भाषण स्पर्धा घेण्यात आली.
- १३ जानेवारी २०२६ ला राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनचरित्रावर भाषण  स्पर्धा घेण्यात आली.
- १४ जानेवारी २०२६ रोजी व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम घेण्यात आला असता प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.नवनाथ बडे सर यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.
- १५ जानेवारी २०२६ ला देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा घेण्यात आली अनेक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.
- १६ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये व पिंजर मध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.
- १७ जानेवारी २०२६ ला योग साधना शिबिर घेण्यात आले असता डॉ. तायडे सर व डॉ. सुनंदा तायडे यांनी योग साधना शिबिरामध्ये योग्य मार्गदर्शन केले.
- १२ जानेवारी २०२६ रोजी 'व्यसनमुक्ती' हा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.
- १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची अयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही सी खारोडे, तसेच डॉ. सपकाळ, डॉ. ए.व्ही वाहूरवाघ आणि प्रा.एस एम मनवर यांची शिवाजी महाराजांच्या जीवनावर

भाषणे झाली. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी आपली भाषणे सादर केली.

* २३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.
* ३ मार्च २०२६ ते १० मार्च २०२६ पर्यंत महाविद्यालयाचे एन एस एस चे शिबिर दत्तक ग्राम भेंडी सूत्रक येथे घेण्यात आले.
* १४ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही सी खारोडे, प्रमुख वक्ते डॉ. ए व्ही वाहूरवाघ तसेच प्रा. सुनील मनवर सर यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये बहुसंख्य विद्यार्थी हजर होते.
* १ मे २०२६ रोजी महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी श्री. गंगारामजी वानखडे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले असून वंदेमातरम गीत गाऊन व राष्ट्रगीत म्हणून 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी हजर होते.

Admitted Students to History Subject for the session 2025-26 and Result of Winter, Examination.

| Sr. No. | Class | Subject | Examiners | Passed | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| 1. | B.A.I(Sem 1) | History DSC(629201) | 53 | 20 | 37.74% |
| | | IKS 001 | 97 | 97 | 100% |
| 2. | B.A.II(SemIII) | History Major (629201) | 11 | 8 | 73.42% |
| | | Major (629208) | 11 | 8 | 74.47% |
| | | IKS 251 | 11 | 10 | 99.41% |
| | | Minor (261) | 17 | 12 | 74.99% |
| 3. | B.A.III (Sem V) | History of World | 44 | 43 | 97.73% |

# ग्रामिण भागातील आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शैक्षणिक प्रगती

प्रा.प्रकाश एस. भगत
(समाजशास्त्र विभाग)

वार्षिक अंकाचा विषय आजचा ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षण हा शब्द संस्कृत मधील आहे त्याचा अर्थ प्रशिक्षण देणे असा होतो. शिक्षणामुळे ज्ञान कौशल्य मूल्य विश्वास सवयीच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे. शिक्षण शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. शिक्षणामुळे अनेक मार्ग उपलब्ध होतात जसे व्यावसायिक मार्ग रोजगार निर्मिती निर्माण करून इतरांना रोजगार मिळवून देणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश होय. शिक्षण घेऊन ज्ञान मिळवण्याबरोबर आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांना पण करून देणे हा एक त्या मागचा महत्त्वाचा उद्देश असतो फक्त आपल्या कुटुंबाच्या गरजा भागविणे असा संकुचित उद्देश नसावा ग्रामीण व नागरी जीवनात फार मोठे अंतर आहे राहण्याची घरे, आरोग्य विषयी सोयी, रस्ते व वाहतूक व्यवस्था चरितार्थ व करमणुकीची साधने आणि सार्वजनिक जीवन यासारख्या बाबतीत शहरांपेक्षा खेडेगावात अनेक  अशा गैरसोयी आहेत. शिक्षणापासून ग्रामीण शिक्षणावर फार मोठा परिणाम होत असतो. विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षण, अभ्यासक्रम, शैक्षणिक प्रशासन या सर्वांचा विचार करताना खेड्यातील वस्तुस्थितीचा विचार करणे खूप गरजेचे असते.

ग्रामीण शिक्षणाचा विचार केला असता ग्रामीण शिक्षण घेत असताना अनेक अडचणी येत असता पूर्व प्राथमिक महाविद्यालयीन, औद्योगिक महाविद्यालयीन प्रौढ शिक्षण इत्यादीचा समावेश होतो. ग्रामीण भागातील शिक्षणाच्या अडचणी दूर करून अधिक चांगले शिक्षण मिळवण्याकरिता निरनिराळ्या तंत्राचा उपयोग कसा करता येईल? असा ग्रामीण भागातील व्यक्तीं समोर प्रश्नच असतो.

शहरी भागातील शिक्षण प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत सर्व सोयी उपलब्ध होत असतात ग्रामीण भागात सोयी सवलती अत्यंत अपुऱ्या असतात. माध्यमिक व उच्च माध्य उच्च महाविद्यालयातील शिक्षण ग्रामीण भागात उपलब्ध नसते. ग्रामीण भागात चांगले शिक्षण देण्याच्या दृष्टीने अनेक अडचणी येतात. खेड्यात शिक्षक वर्ग मिळणे कठीण असते. खेड्यातील मुलांना हस्तव्यवसाय, विज्ञान, चित्रकला, गायन इत्यादी विषयाचे शिक्षण मिळणे कठीण असते.

तीस वर्षापासून ग्रामीण भागात स्थापना झालेले वरिष्ठ महाविद्यालय भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज पिंजर परिसरात उत्कृष्ट शिक्षणाची संधी ग्रामीण विद्यार्थी व विद्यार्थिनींना

उपलब्ध करून दिली. खेड्यातील परिस्थिती ही अतिशय हलाखीचे असते दारिद्र्याच्या अवस्थेत अनेक कुटुंबे आपले दैनंदिन जीवन जगत असतात. आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करून उरलेला पैसा ग्रामीण भागातील लोक मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करीत असतात. आपल्या मुलाने खूप शिकावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे अशी ग्रामीण भागातील पालकांची अपेक्षा असते कारण कोणत्याही प्रकारचे ग्रामीण भागात शैक्षणिक माहिती असलेले व्यक्ती नसतात. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, डॉक्टर पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांची पुस्तके वाचून विद्यार्थी आपली जीवनाची दिशा ठरवीत असतात. ग्रामीण भागातून तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी दळणवळणाची साधने उपलब्ध नसताना. अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार व मेहनती असूनही त्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे ते बाहेरगावी शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकत नव्हते. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थी मागे राहत होता कोणत्याही प्रकारचे स्पर्धा परीक्षा यासाठी लागणारे कोचिंग क्लास उपलब्ध नव्हते. उत्कृष्ट प्राध्यापक वर्ग आणि स्पर्धा परीक्षेसाठी उपयोगी विषय उपलब्ध व्हावे ती आणि त्यामधून स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व्हावा यासाठी महाविद्यालयात शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक भाऊसाहेब लहाने यांनी पिंजर परिसरात खेड्यातील विद्यार्थी यांना महाविद्यालयीन शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थी उद्योग व्यवसायात अग्रेसर व्हावा व त्याच्या अंगी असलेले कला कौशल्य स्वतः ओळखून विविध उद्योगधंदे करण्यासाठी शेतकरी वर्गातील मुले पुढे येण्यासाठी करिअर कट्टा या माध्यमातून महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयात संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे देशातील उद्योगपती हे विद्यार्थ्यांना उद्योगाविषयी महत्वपूर्ण माहिती व्हावी यासाठी उद्योगपती आपल्या भेटीला ही संधी उपलब्ध करून देण्यात येऊन तसेच स्पर्धा परीक्षा अतिशय महत्त्वाची असून आजच्या परिस्थितीत महाविद्यालयामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ विद्यापीठांतर्गत शारीरिक शिक्षण विभागातर्फे व राष्ट्रीय सेवा योजना या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण व्हावा याकरिता महाविद्यालयात खेळांचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले ज्याअर्थी कोणताही विद्यार्थी खेळामध्ये मागे न राहता त्याला त्या खेळा मधून स्वतःचे जीवन चांगल्या प्रकारे जगता यावे तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी उत्कृष्ट दर्जाची पुस्तके यूपीएससी एमपीएससी बँक परीक्षा व रेल्वे परीक्षा पोलीस भरती तसेच इतर उपलब्ध अभ्यासक्रमा व्यतिरिक्त पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज पिंजर, जि.अकोला

**सत्र २०२५-२६ या वर्षी समाजशास्त्र विभागातर्फे राबविलेले उपक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| १) | १) करिअर कट्टा आणि उद्योगपती आपल्या दारी<br>२) स्पर्धा परिक्षा मार्गदर्शक | १३ नोव्हेंबर २०२५ |

**सत्र २०२५-२६ या वर्षी समाजशास्त्र विषयाचे प्रवेशित विद्यार्थी आणि परिक्षेला बसलेले व उत्तीर्ण टक्केवारी**

| | | प्रवेशित विद्यार्थी | परिक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | B.A.I. Sem.I | 58 | 42 | 72.41% |
| २) | B.A.II. Sem.III | 16 | -- | -- |
| ३) | B.A.III. Sem.V | 50 | 47 | 94% |
| | Dsc-Sociology | 22 | 21 | 95.45% |

# ।। शिदोरी ।।

खुप काम करावे । परिचय संबंध वाढवावे । घनिष्ठ मित्र बनवावे कार्यकर्ते ।। जय श्रीराम
नाना लोकं, नाना स्वभावे । काळे, बेरे, उजवे, डावे । सर्वांचे राखावे निट । अवधान ।। हरिओम
छोटे,मोठे, जुने, नविन । सर्वांशी जुळवावी धुन । कोणीही न म्हणावे । निष्ठेमुळे ।। श्रीराम जय राम जय जय राम ।।
पुर्व ग्रह धरु नये । आपलीच पुंगी वाजवू नये । सतरा फाटे फोडु नये । विचारात ।। हरिओम ।।
प्रेमाशिवाय रागावू नये । उगीच जास्त काळजु नये । कधीच कुणाचे दुखवू नये । कोमलमन।।
नेहमी गोड बोलावे । स्पष्ट विचार मांडावे । पण तत्पूर्वी स्थान लोक पहावे । मग बोला ।।
स्वत: टिका करु नये । परनिंदा मनात आणु नये । स्वत:चे वागणे व्हावे । शम्यतो निर्दोष ।।
आपला उत्साह दिसावा । लोकांचा वाढवावा । एक एक उभा करावा । कार्यकर्ता ।। जय हरी ।।
वेळ लागेल हरकत नाही । फळ उशिरा मिळेल काही । धन संच उभा करणे पाही ।। नेहमीच ।।
एकटाच खप खप खपला । मागे कोणी नाही उरला । जसा पाण्याबरोबर मुरला ।। बुडबुडा ।।
म्हणून मुख्य संच करा । क्षणीक लाभ मनी धरा । हळुहळु पण पक्का करा । पाया कामाचा ।।
काय करता उत्साह वाढे । आपल्या निघायचे घोडे । नेहमी पुढे पुढे आणि ।। पुढेच धावावे ।।
वाट घेतली पुण्याची । जरी अवघड तरी पराक्रमाची । ती कधीच न घ्यावी । परतिची ।। ओम् ।।
वचन, मनन, अनुभव, श्रवण । नियमित जिवन । योग्य शरिर, बुद्धी, मन । यांनी धडे ।। जय श्रीराम ।।
परंतू हे सर्व काही । सेवते त्यापेक्षा अधिक थोडे काही । म्हणजे त्याचा योग्य होई । परिणाम ।। ओम् ।।
असो काय लिहू अधिक ? सुज्ञ जाणत्यांना आणिक । तुमच्याच पासून घेतले एक । तेच लिहीले ।।
प्रत्येकाकडून शिकावे । अनावश्यक ते टाकुन द्यावे । डोळे उघडे ठेवून पहावे । सर्व लोक ।।
लोकापेक्षा फार वेगळे नसावे । अगदी लोकासारखेच न व्हावे । मर्यादा राखून वागावे ।। हरीओम्।।

डॉ.मोहनजी मधुकरराव भागवत, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**संकलन स्व.श्री.भाऊराव महल्ले**

।।श्री हरी ओम नमो शिवाय।। - श्रीराम जय राम जय जय राम ।।

| | | |
|---|---|---|
| तेज | - | सुर्याचे |
| शित | - | चंद्राचे |
| गुण | - | रामाचे |
| निती | - | कृष्णाची |
| शक्ती | - | शिवाची |
| भक्ती | - | नानकाची |

| | | |
|---|---|---|
| चारित्र्य | - | शिवाजीचे |
| शौर्य | - | प्रतापाचे |
| त्याग | - | दधिचिचा |
| तत्व | - | बुद्धाचे |
| दया | - | महाविराची |
| स्नेह | - | मातेचा |

वरील सर्व गुण आपणास प्राप्त होवोत. हीच ''श्री'' चरणी प्रार्थना करतो - धन्यवाद -
सच काम किया है जिसके उसने प्रभु का नाम लिया न लिया ।। संत कबीर

**स्व.भाऊराव महल्ले**

## वडिल :- न बोलणारा हिरा

वडिल म्हणजे शांत समुद्रासारखे,
बाहेरुन कणखर, आतुन मायेने भरलेले,
त्यांच्या कपाळावरच्या आठ्या सांगतात कथा,
कष्टांच्या प्रत्येक दिवसाची व्यथा...।।१।।

स्वत:च्या स्वप्नांना ठेवतात बाजूला,
मुलांच्या भविष्यासाठी झटतात रात्रंदिवस
अखंडपणे, सगळं काही देऊन टाकतात पुर्णपणे.
''मी आहे तुझ्यासोबत'' हा निशब्द श्वास...।।२।।

यश मिळालं की तेच सर्वात आधी हसतात,
अपयश आलं की खंबीरपणे पाठीशी उभे राहतात
वडील म्हणजे आकाशासारखा आधार,
त्यांच्यामूळेच जिवन होतं साकार...।।३।।

आज त्यांच्या चरणी ठेवते मान,
माझे वडीलच माझा खरा अभिमान...।।४।।

कु. सायली तायडे
वर्ग - बी.ए.भाग १

## चारोळी

पूर्वजन्माची पुण्याई असावी
जन्म जो गर्भात घेतला,
जग पाहिलं नव्हतं तरी
नऊ महिने श्वास स्वर्गात घेतला

आई तुझ्या कुशीत
पुन्हा यावेसे वाटते
निर्दयी या जगापासून,
दुर जावेसे वाटते...

आई हजार जन्म घेतले तरी
एका जन्माचे ऋण फिटणार नाही
आई. लाख चुका होतील मजकडून
तुझं समजावणं मिटणार नाही

शोधून मिळत नाही पुण्य
सेवार्थाने व्हावे धन्य
कोण आहे तुजविण अन्य ?
'आई' तुजविण जग हे
शून्य

आई, तुझ्यापुढे ही
माझी व्यथा कशाला ?
जेव्हा तुझ्यामुळे ह्या
जन्मास अर्थ आला...

मुंबईत घाई
शिर्डीत साई, फुलात जाई
गल्ली गल्लीत भाई
पण जगात भारी
केवळ आपली आई !

कु. स्विटी सुनिल घनगांव
वर्ग - बी.ए.भाग ३

## चारोळी

सगळी नाती नकली असतात

वेळ आली की सगळे साथ सोडतात

पण या आयुष्यात

दोनच नाती

एक

# आईच्या मायेचा हात

आणि

# बापाची साथ

आयुष्यभर सोबत राहतात.

**Love you Aai Baba**

कु. स्विटी सुनिल घनगांव
वर्ग - बी.ए.भाग ३

## बापाची ती एक शिकवण

माझे बाबा शांत, कष्टाळू , प्रेमळ,
घरासाठी आयुष्य घालवणारे निखळ
त्यांच्या डोक्यात माया अपार,
त्यांच्या शब्दात होता खरा आधार

लहान होते मी त्यावेळी,
एक बक्षीस मिळालं आनंदाने खरी
पण त्यात मदत काकांची होती,
ही गोष्ट बाबांना पटली नव्हती.

पहिल्यांदाच त्यांनी मला रागावलं,
क्षणभर मन माझं घाबरुन गेलं,
पण त्या रागातही प्रेम दडलं होतं,
''स्वत:च्या कष्टावर उभं रहा''
हेच त्यांनी शिकवलं होतं.

आज बाबा जवळ नाहीत जरी,
आठवणी मात्र आहेत हृदयी भारी
त्यांची शिकवण माझा दीप झाला,
जीवनमार्गाला उजेड देणारा एक तारा झाला.

देव त्यांना शांतता दे अपार,
माझे बाबा... माझा अभिमान.... माझा आधार

कु. प्राची इंगळे
वर्ग - बी.ए.भाग १

## वडिलांच्या मनातील भावना...!

लेकीकडून दु:ख मला कधीच नाही मिळालं
चिमणी कधी मोठी झाली कधीच नाही कळालं...

पोरगी जाणार म्हणलं की पोटात उठतो गोळा
अंथरुणावर पडतो पण लागत नाही डोळा...

खरच माझी लेक आता मला सोडून जाईल
अंगण, ओसरी, गोठा सारं सुन-सुन होईल...

दारी सजतो मांडव पण उरात भरते धडकी
आता मला सोडून जाणार माझी चिमणी लाडकी...

भरलेल्या मांडवात बाबा कहाणी सांगत असतात
कल्याण झाल म्हणत म्हणत सारखे डोळे पुसतात...

पुन्हा-पुन्हा लेकीकडे बाबा पाहतात चोरुन
कितीही समजुत घातली तरी डोळे येतात भरुन...

लेकीचा सांभाळ करा म्हणून बाप हात जोडीत असतो
डोळ्यामध्ये पाणी आणून केवीलवाने पाहत राहतो...

कठोर दिसत असला तरी मनाने खुप हळवा असतो
लेकीच्या पाठविण्याच्या वेळी बापच खुप खचलेला दिसतो...

पोटचा गोळा दिल्यानंतर पापणी का मिटत नाही?
कितीही डोळे पुसले तरी पाणी काही हटत नाही...

शेवटी

बापाची प्रॉपटी नाही तर बापाची सावली सोबत असायला हवी,
कारण जसं आईशिवाय घर अपूर्ण दिसतं...
तस बापाशिवाय आपलं संपूर्ण आयुष्य अपूर्ण असतं...!

माझे बाबा.

कु.अश्विनी चिकटे
वर्ग - बी.ए.भाग ३

## मी एकटी

उगाच का मी एकटी असते
आपल्या माणसातही परकी असते
खडतर वाटेवरती निराशाची ठेच लागते
न दिसणाऱ्या देवाला मुठभर सुख मागते
येता जाता कुणास ठाऊक मी काय विसरते

माणसाच्या प्रचंड गर्दीत मी स्वत:ला एकटी पाहते
सगळ काही ठिक होईल या आशेवर हलाखीचे दिवस काढते
जास्तीची अपेक्षा न करता जे काही मिळेल त्यात सुख मानते
नको असलेल्या गोष्टीपासून मी स्वत:ला लांब करते
असं हे माझ आयुष्य जे मी एकटी जगते.

कु. आयुषी हटकर
वर्ग - बी.ए.भाग ३

# आई... शब्दात न मावणारी

आईवर आपण काय बोलणार ?
बोलायला बसलो तर शब्द कमी पडणार
'आई' हा शब्द बोलायला एकदम सोप्पा
पण अर्थ खुप खोल आणि भावनिक आहे

जिने जन्म दिला आपल्याला ती स्त्री म्हणजे आई
आई म्हणजे आधार, प्रेम, त्याग आणि जिव्हाळा यांचा अखंड झरा

आई म्हणजे फक्त जन्म देणारी नाही,
तर आपल्याला घडविणारी, संस्कार देणारी व्यक्ती आहे

आई तुझं प्रेम शब्दात मावत नाही, ते समुद्रापेक्षाही मोठं आहे
माझं सर्व आयुष्य जरी दिलं तरी तुझे उपकार फेडण शक्य नाही

आई स्वत: उन्हात राबते दिवसभर पण मला सावली म्हणून जपते...
जग कितीही बदललं तरीही ती माझ्याच बाजूने राहते...

माझ्या चुकांवर ओरडते
पण त्या ओरडण्यातही प्रेम दडले असते...

आई तु आहे म्हणूनच माझं जग आहे
तु नसशील तर सगळच जग रिकामं आहे

आई तुच माझं सुख, तुच माझं प्रेम
तुच माझ संपूर्ण आयुष्य आहेस

जगात काहीही मिळालं तरी तुझ्यासारखं कोणीच नाही
आई तुच माझं सर्वस्व आहेस, तुझ्या-शिवाय मी काहीच नाही.

कु. संचिता ढवळे
वर्ग - बी.ए.भाग १

# बाप

जोपर्यंत बाप जिवंत असतो,
तोपर्यंत मनात कोणतीच चिंता नसते,
झोप गाढ लागते,
घराची काळजी नाही, बाहेरचं टेन्शन नाही
कारण मनात नेहमी एकच खात्री असते
''बाप आहे ना'' जबाबदाऱ्या असतात
पण मन हलक असतं.
पण ज्या क्षणी बाप निघून जातो,
झोप, भुक, सुकुन सगळं हरवून जातं,
रात्री हलकासा आवाज झाला तरी डोळे
उघडतात कारण बाप फक्त घराचा आधारच नाही.
तो घराचा चौकीदारही होता.
जेव्हा पैशाची अडचण येते
तेव्हा जाणवतं बाप म्हणजे घराची बँक होता
जेव्हा मन खचतं
तेव्हा समजतं बाप म्हणजे आपल्या धैर्याची भिंत होती,
तो फक्त वडील नव्हता,
तो ढाल होता, कवच होता,छप्पर होता, अन्न होता,
कपडा होता, झोप आणि सुकुन होता म्हणूनच
जोपर्यंत बाप जिवंत आहे तोपर्यंत त्याची कदर करा,
कारण तो गेल्यावर आयुष्यात दिवसा देखिल अंधार वाटेल...!

कु. राजश्री सुनिल घनगांव
वर्ग - बी.ए.भाग ३

# ''माझं गाव माझी जबाबदारी''

गाव म्हणजे फक्त माती नाही
तो आपल्या स्वप्नांचा पाया आहे
रस्ते, नाल्या, शाळा, अंगणवाडी, मंदिरे
यांच्यातच उद्याचा भारत दडला आहे

जर गाव स्वच्छ, सुंदर आणि सुशिक्षित असेल
तरच भविष्य उज्वल होईल
प्रत्येक तरुणाने पुढे येऊन
गाव बदलण्याचा संकल्प केला पाहीजे

नुसती टिका करुन उपयोग नाही
कामातून बदल घडवावा लागतो
माझं गाव, माझी जबाबदारी
हा विचार मनात रुजवावा लागतो
तर गावचा विकास निश्चित आहे.

महेश सं. भेंडकर
बि.ए.भाग ३

# मैत्री
# तु आणि मी

मैत्री कशी असावी तुझ्या आणि माझ्या सारखी असावी
चुकली तर रागावणारी
प्रेमाने समजुन घेणारी
शब्दात न सांगता डोळ्यात पाहून ओळखणारी
प्रेमाने मिठी मारणारी
मैत्री कशी असावी...

प्रेमाने हाक मारणारी
स्वत:पेक्षा जास्त विश्वास ठेवणारी
जिवापाड प्रेम करणारी
भावनांना माझ्या समजुन घेणारी
मैत्री अशी असावी....

आयुष्यात जरी कितीही आले तरी
हृदयात जागा फक्त तिची असावी
वेळ नसला तरी वेळ काढून मला वेळ देणारी
मैत्री अशी असावी...

या स्वार्थी जगात निस्वार्थ प्रेम करणारी
सुख: दु:खात साथ देणारी
स्वार्थी न होता सारथी होणारी
मैत्री अशी असावी...

माझ्या स्वप्नांना आकाशात झेप घे म्हणणारी
पंखांना उंच भरारी देणारी
मैत्री अशी असावी...
तुझ्या आणि माझ्या सारखी असावी
मैत्री अशी असावी...

कु.स्नेहा सुरेश भारस्कर

# अभ्यास दौरा अहवाल

स्थळ :- पोहरादेवी (Poharadevi)

विभाग :- इंग्रजी व राज्यशास्त्र विभाग

दिनांक :- ०७/०२/२०२६

✻ महाविद्यालयाच्या इंग्रजी व राज्यशास्त्र विभागामार्फत आयोजित पोहरादेवी येथील अभ्यास दौऱ्यात सहभागी होणे माझ्यासाठी एक अत्यंत प्रेरणादायी व शैक्षणिक अनुभव ठरले. हा दौरा केवळ ऐतिहासिक स्थळांचे अवलोकन करण्यापुरता मर्यादित न राहता, समाज, संस्कृती, धर्म व सामाजिक योगदान यांचे प्रश्न प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा एक अनमोल मार्ग ठरला. या दौऱ्यात आम्ही नगारा भवन, अंबा माता मंदिर, पोहरादेवी आणि सेवालाल महाराज मंदिर व समाधी या ठिकाणी भेट दिली.

✻ नंगारा भवन : हे बंजारा समाजाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे ठिकाण आहे. येथे आम्हाला बंजारा समाजाच्या पारंपारिक जीवनशैली, नृत्य, संगीत व कला याबद्दल माहिती मिळाली. मार्गदर्शकांनी बंजारा समाजाच्या इतिहासाची सखोल माहिती दिली, ज्यामुळे त्यांच्या संघर्षमय जीवन आणि सामाजिक योगदानाची जाणीव झाली, तसेच येथे जाईल त्या प्रत्येक कोपऱ्यातील स्थापत्यशास्त्र आणि नंगारा भवनाची रचना पाहून मला त्यांची वास्तुशास्त्रीय कौशल्ये समजली.

✻ अंबा माता मंदिर, पोहोरादेवी : हे धार्मिक दृष्ट्या अत्यंत प्रसिध्द ठिकाण आहे. येथे देवीच्या पूजा पद्धती उत्सव व स्थानिक समूदायातिल धार्मिक जीवन याबाबत माहिती मिळाली. या मंदिरात उपस्थित लोकांच्या श्रध्दा पाहून आणि स्थानिक परंपरा समजून, मला धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव अधिक स्पष्ट झाली.

✻ सेवालाल महाराज मंदिर व समाधी : येथे भेट दिली. सेवालाल महाराजांनी समाजसेवा आणि मानवतावादाबाबत केलेले कार्य ऐकून मला खूप प्रेरणा मिळाली. त्यांचे जीवन आणि शिकवणी सामाजिक उत्तरदायित्व, संस्कार, व धर्मीय सेवा यांचे महत्व अधोरेखित करतात. १. त्यांच्या समाधीच्या ठिकाणी उपस्थित राहुन आणि त्यांच्या बद्दल मार्गदर्शकांकडून ऐकून मला जीवनातील आदर्श मूल्यांची जाणीव झाली. या अभ्यास दौऱ्यामुळे मला सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या अनमोल अनुभव मिळाला. राज्यशास्त्र विषयाच्या दृष्टीने समाजातील संघटनांची

एकंदरीत हा अभ्यासदौरा माझ्यासाठी अत्यंत संस्मरणीय ठरला. या दौऱ्याव्दारे मला फक्त रचना, त्यांचे कार्य व सामाजिक परिणाम प्रत्यक्ष पाहून समजले. इंग्रजी विषयाच्या दृष्टीने निरिक्षण कौशल्य, विश्लेषणात्मक विचार आणि अहवाल लेखन यामध्ये मला स्वतःला सुधारण्याची संधी मिळाली. ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती नाही तर समाजातील विविध घटकांचे योगदान, त्यांच्या परंपरा व सांस्कृतिक मूल्यांची जाणीवही झाली. अशा प्रकारचे अभ्यासदौरे, भविष्यातही आयोजित करण्यात यावेत, ही माझी अपेक्षा आहे.

नाव :- कु. प्राची महादेव इंगळे
(बि.ए.भाग १)

**Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College, Pinjar**

**Committees** (Session -2025-2026)

| S.No. | Committee | Members | Designation |
|---|---|---|---|
| 1 | College Development Committee | **Dr. Vinod C. Kharode** | **Secretary** |
| 2 | IQAC | **Dr.Ashok V. Wahurgagh** | **Co-ordinator** |
| 3 | Students Development Cell | **1. Dr.Ashok V. Wahurgagh**<br>2. Dr. Pankaj M. Tayade<br>3. Dr. Wasudeo W. Bhagat<br>4. Dr. Manoj K. Phadnis | **Chairman**<br>Member<br>Member<br>Member |
| 4 | Academic Monitoring Committee | **1. Dr. Pankaj M. Tayade**<br>2. Dr. Ashok V. Wahurwagh<br>3. Dr. Ramkrushna N. Gawande<br>4. Dr. Manoj K. Phadnis | **Chairman**<br>Member<br>Member<br>Member |
| 5 | Board of Examinations & Internal Assessment | **1. Dr. Wasudeo W. Bhagat**<br>2. Dr. Ramkrushna N. Gawande<br>3. Shri. Santosh P. Giri<br>4. Dr. Manoj K. Phadnis | **Chairman**<br>Member<br>Member<br>Member |
| 6 | Career Guidance, Competitive Examination and Placement Cell | **1. Prof. Sunil M. Manwar**<br>2. Dr. Nanasaheb B. Sapkal<br>3. Shri. Santosh P. Giri<br>4. Pra Ranjeet Hiwrale | **Chairman**<br>Member<br>Member<br>Member |
| 7 | Cultural and Sports Committee | **1. Dr.Nanasaheb B. Sapkal**<br>2. Dr. Wasudeo W. Bhagat<br>3. Dr. Rekha S. Kalbande<br>4. Shri. Santosh P. Giri | **Chairman**<br>Member<br>Member<br>Member |

| S.No. | Committee | Members | Designation |
|---|---|---|---|
| 8 | SC/ST Cell | **1. Dr. Ashok V. Wahurwagh** | **Chairman** |
| | | 2. Dr. Pankaj M. Tayade | Member |
| | | 3. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| | | 4. Dr. Manoj K. Phadnis | Member |
| 9 | Anti-Ragging Cell | **1. Dr. Rekha S. Kalbande** | **Chairman** |
| | | 2. Dr. Nanasaheb B. Sapkal | Member |
| | | 3. Dr.Ramkrushna N. Gawande | Member |
| | | 4. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| 10 | Internal Complaint Committee ICC | **1. Dr.Rekha S. Kalbande** | **Chairman** |
| | | 2. Dr. Nanasaheb B. Sapkal | Member |
| | | 3. Dr.Ramkrushna N. Gawande | Member |
| | | 4. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| 11 | Students Grievance Redressal Committee | **1. Dr.Rekha S. Kalbande** | **Chairman** |
| | | 2. Dr. Nanasaheb B. Sapkal | Member |
| | | 3. Dr.Ramkrushna N. Gawande | Member |
| | | 4. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| 12 | Students Alumni Association | **1. Dr.Wasudeo W. Bhagat** | **Chairman** |
| | | 2. Dr.Ramkrushna N. Gawande | Member |
| | | 3. Dr. Pankaj M. Tayade | Member |
| | | 4. Dr. Manoj K. Phadnis | Member |
| 13 | Sale Purchase and maintenance committee | **1.Dr.Ramkrushna N. Gawande** | **Chairman** |
| | | 2. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| | | 3. Dr. Pankaj M. Tayade | Member |
| | | 4. Shri.Devanand D. Bakal | Member |

| S.No. | Committee | Members | Designation |
|---|---|---|---|
| 14 | Feedback Cell | **1.Dr.Ramkrushna N. Gawande** | **Chairman** |
| | | 2. Dr. Pankaj M. Tayade | Member |
| | | 3. Dr. Ashok V. Wahurwagh | Member |
| | | 4. Dr. Manoj K. Phadnis | Member |
| 15 | Research and Publication Cell | **1. Dr. Pankaj M. Tayade** | **Chairman** |
| | | 2. Dr. Ashok V. Wahurwagh | Member |
| | | 3. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| | | 4. Dr. Manoj K. Phadnis | Member |
| 16 | Technical Maintenance Committee | **1. Dr.Pankaj M. Tayade** | **Chairman** |
| | | 2. Dr. Wasudeo W. Bhagat | Member |
| | | 3. Dr.Nanasaheb B.Sapkal | Member |
| | | 4. Dr. Manoj K. Phadnis | Member |
| 17 | Time Table Committee | **1. Dr. Manoj K. Phadnis** | **Chairman** |
| | | 2. Dr. Pankaj M. Tayade | Member |
| | | 3. Dr.Ashok V. Wahurwagh | Member |
| | | 4. Shri. Santosh P. Giri | Member |
| 18 | Annual Magazine Committee | **1.Dr.Ramkrushna N. Gawande** | **Chairman** |
| | | 2. Dr.Wasudeo W. Bhagat | Member |
| | | 3. Shri. Santosh P. Giri | Member |
| 19 | Admission Committee | **1. Dr. Ashok V. Wahurwagh** | **B.A.I.** |
| | | 2. Dr. Pankaj M. Tayade | B.A.II |
| | | 3. Dr. Wasudeo W. Bhagat | B.A.III |

**Bhausaheb Lahane Dnyanprakash Art's College, Pinjar**
**Tq. Barshi Takli Dist.Akola**

Annual Planning - 2025-26

Action Plan

| S.No. | Date | Day | Action Plan |
|---|---|---|---|
| 1 | 06/07/2025 | Friday | Session Commencement, College Development of Committee meeting & meeting of IQAC |
| 2 | 11/07/2025 | Friday | Staff Council meeting |
| 3 | 23/07/2025 | Wednesday | Lokmanya Tilak Jayanti and Forest conservation day |
| 4 | 01/08/2025 | Friday | Lokmanya Tilak death anniversary and Annabhau Sathe Jayanti |
| 5 | 05/08/2025 | Tuesday | Staff Council meeting |
| 6 | 12/08/2025 | Tuesday | Parents Meeting converner Dr. Wasudeo Bhagat Sir |
| 7 | 15/08/2025 | Friday | Celebration Independence day |
| 8 | 25/08/2025 | Monday | Organizing seminar in college organizer Prof. S.M.Manwar Sir |
| 9 | 30/08/2025 | Saturday | Establishing the board of study Dr. R.N.Gawande |
| 10 | 02/09/2025 | Tuesday | Staff Council meeting |
| 11 | 05/09/2025 | Friday | Teacher's Day |
| 12 | 08/09/2025 | Monday | World Literacy Day |
| 13 | 23/09/2025 | Tuesday | Dignitaries and organizing their seminars Dr. M.K.Phadnis Sir. |
| 14 | 24/09/2025 | Wednesday | National Service Scheme Day |
| 15 | 02/10/2025 | Thursday | Mahatma Gandhi and Lal Bahadur Shastri birth anniversary |
| 16 | 07/10/2025 | Tuesday | Staff Council meeting |

| S.No. | Date | Day | Action Plan |
|---|---|---|---|
| 17 | 11/10/2025 | Saturday | Rashtrasant Tukdoji Maharaj death anniversary |
| 18 | 13/10/2025 to2/11/2025 | Monday Sunday | First Session Vacation |
| 19 | 03/11/2025 | Monday | Session commencement middle, college development committee meeting & Meeting of IQAC |
| 20 | 01/12/2025 | Monday | World Elimination AIDS Day |
| 21 | 06/12/2025 | Saturday | Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Mahaprinirvan Din |
| 22 | 08/12/2025 | Monday | Staff Council Meeting |
| 23 | 09/12/2025 | Tuesday | Conducting seminar Dr. A.V.Wahurwagh Sir. |
| 24 | 11/12/2025 | Thursday | National Service Scheme Camp |
| 25 | 20/12/2025 | Saturday | Sant Gadge Baba death anniversary |
| 26 | 01/01/2026 | Thursday | Staff council Meeting |
| 27 | 03/01/2026 | Saturday | Savitribai Phule birth anniversary |
| 28 | 08/01/2026 | Thursday | Conducting competitive examination Dr.P.M.Tayade Sir |
| 29 | 09/01/2026 | Friday | Organising seminars prof. S.M.Manwar Sir |
| 30 | 12/01/2026 | Tuesday | Jijabai Jayanti & Swami Vivekanand Jayanti |
| 31 | 26/01/2026 | Monday | Celebrating Republic Day |
| 32<br>33 | 30/01/2026<br>02/02/2026 | Friday<br>Monday | Martyr's Day<br>Staff Council Meeting |
| 34 | 19/02/2026 | Thursday | Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti |
| 35<br>36 | 23/02/2026<br>28/02/2026 | Monday<br>Sunday | Sant Gadge Baba Jayanti<br>World Science Day |
| 37 | 02/03/2026 | Monday | Staff Council Meeting |
| 38 | 08/03/2026 | Sunday | World Womens day |
| 39 | 11/03/2026 | Wednesday | Late Bhausaheb Lahane death anniversary |

| S.No. | Date | Day | Action Plan |
|---|---|---|---|
| 40 | 01/04/2026 | Wednesday | Staff Council Meeting |
| 41 | 14/04/2026 | Tuesday | Dr. Babasaheb Ambedkar Jayanti |
| 42 | 18/04/2026 | Saturday | World Earth Day |
| 43 | 22/04/2026 | Wednesday | Session ending, College Development Committee Meeting & Meeting of IQAC |
| 44 | 01/05/2026 | Friday | Maharashtra Day |
| 45 | 20/04/2026 to 03/06/2026 | Monday Wednesday | Second Session Vacation |

**Bhausaheb Lahane Dnyanprakash Art's College, Pinjar**
**Tq. Barshi Takli Dist.Akola**
Annual Planning - 2026-27
Action Plan

| S.No. | Date | Day | Action Plan |
|---|---|---|---|
| 1 | 18/06/2026 | Thursday | Session Commencement, College Development of Committee meeting & meeting of IQAC |
| 2 | 11/07/2026 | Saturday | Staff Council meeting |
| 3 | 23/07/2026 | Thursday | Lokmanya Tilak Jayanti and Forest conservation day |
| 4 | 01/08/2026 | Saturday | Lokmanya Tilak death anniversary and Annabhau Sathe Jayanti |
| 5 | 05/08/2026 | Wednesday | Staff Council meeting |
| 6 | 11/08/2026 | Tuesday | Parents Meeting converner Dr. Wasudeo Bhagat Sir |
| 7 | 15/08/2026 | Saturday | Celebration Independence day |
| 8 | 25/08/2026 | Tuesday | Organizing seminar in college organizer Prof. S.M.Manwar Sir |
| 9 | 29/08/2026 | Saturday | Establishing the board of study Dr. R.N.Gawande |
| 10 | 02/09/2026 | Wednesday | Staff Council meeting |
| 11 | 05/09/2026 | Saturday | Teacher's Day |
| 12 | 08/09/2026 | Tuesday | World Literacy Day |
| 13 | 23/09/2026 | Wednesday | Dignitaries and organizing their seminars Dr. M.K.Phadnis Sir. |
| 14 | 24/09/2026 | Thursday | National Service Scheme Day |
| 15 | 02/10/2026 | Friday | Mahatma Gandhi and Lal Bahadur Shastri birth anniversary |
| 16 | 07/10/2026 | Wednesday | Staff Council meeting |

| S.No. | Date | Day | Action Plan |
|---|---|---|---|
| 17 | 31/10/2026 | Saturday | Session commencement middle, college development committee meeting & Meeting of IQAC |
| 18 | 2/11/2026to 31/11/2026 | Monday Saturday | First Session Vacation |
| 19 | 28/11/2026 | Saturday | Mahatma Jyotiba Fule death Anniversary |
| 20 | 01/12/2026 | Tuesday | World Elimination AIDS Day |
| 21 | 06/12/2026 | Sunday | Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Mahaprinirvan Din |
| 22 | 08/12/2026 | Tuesday | Staff Council Meeting |
| 23 | 09/12/2026 | Wednesday | Conducting seminar Dr. A.V.Wahurwagh Sir. |
| 24 | 11/12/2026 | Friday | National Service Scheme Camp |
| 25 | 20/12/2026 | Sunday | Sant Gadge Baba death anniversary |
| 26 | 01/01/2027 | Friday | Staff council Meeting |
| 27 | 03/01/2027 | Sunday | Savitribai Phule birth anniversary |
| 28 | 08/01/2027 | Friday | Conducting competitive examination Dr.P.M.Tayade Sir |
| 29 | 09/01/2027 | Saturday | Organising seminars prof. S.M.Manwar Sir |
| 30 | 12/01/2027 | Tuesday | Jijabai Jayanti & Swami Vivekanand Jayanti |
| 31 | 26/01/2027 | Tuesday | Celebrating Republic Day |
| 32 | 30/01/2027 | Saturday | Martyr's Day |
| 33 | 02/02/2027 | Tuesday | Staff Council Meeting |
| 34 | 19/02/2027 | Friday | Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti |
| 35 | 23/02/2027 | Tuesday | Sant Gadge Baba Jayanti |
| 36 | 02/03/2027 | Tuesday | Staff Council Meeting |
| 37 | 08/03/2027 | Monday | World Womens day |
| 38 | 11/03/2027 | Thursday | Late Bhausaheb Lahane death anniversary |
| 39 | 01/04/2027 | Thursday | Staff Council Meeting |

| S.No. | Date | Day | Action Plan |
|---|---|---|---|
| 40 | 14/04/2027 | Wednesday | Dr. Babasaheb Ambedkar Jayanti |
| 41 | 22/04/2027 | Thursday | World Earth Day |
| 42 | 24/04/2027 | Saturday | Session ending, College Development Committee Meeting & Meeting of IQAC |
| 43 | 01/05/2027 | Saturday | Maharashtra Day |
| 44 | 26/04/2027 to 05/06/2027 | Monday Saturday | Second Session Vacation |

## Cast Wise Student Data 2024-25

| Class | SC | | | ST | | | VJNT | | | OBC | | | OPEN | | | Total | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B.A.I | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total |
| B.A.II | 14 | 11 | 25 | 0 | 1 | 1 | 32 | 18 | 50 | 26 | 21 | 47 | 6 | 0 | 6 | 78 | 51 | 129 |
| B.A.III | 5 | 7 | 12 | 3 | 1 | 4 | 14 | 7 | 21 | 16 | 24 | 40 | 0 | 2 | 2 | 38 | 41 | 79 |
| | 8 | 10 | 18 | 0 | 1 | 1 | 12 | 5 | 17 | 13 | 24 | 37 | 0 | 0 | 0 | 33 | 40 | 73 |
| Total | 27 | 28 | 55 | 3 | 3 | 6 | 58 | 30 | 88 | 55 | 69 | 124 | 6 | 2 | 8 | 149 | 132 | 281 |

## V J N T

| Class | VJ | | | NTB | | | NTC | | | NTD | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total |
| B.A.I | 11 | 7 | 18 | 17 | 4 | 21 | 3 | 7 | 10 | 1 | 0 | 1 |
| B.A.II | 6 | 1 | 7 | 2 | 2 | 4 | 3 | 0 | 3 | 3 | 4 | 7 |
| B.A.III | 7 | 1 | 8 | 1 | 2 | 3 | 3 | 0 | 3 | 1 | 2 | 3 |
| Total | 24 | 9 | 33 | 20 | 8 | 28 | 9 | 7 | 16 | 5 | 6 | 11 |

## भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज पिंजर जि.अकोला
## जात निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या २०२५-२६

| Class | SC | | ST | | VJ | | NT | | OBC | | OPEN | | Total | | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| B.A.I. | 07 | 10 | 02 | 01 | 11 | 15 | 09 | 08 | 20 | 20 | 03 | 01 | 52 | 55 | 107 |
| B.A.II | 05 | 12 | 00 | 0 | 02 | 05 | 08 | 07 | 10 | 12 | 04 | 00 | 29 | 36 | 65 |
| B.A.III | 04 | 06 | 03 | 01 | 02 | 01 | 05 | 07 | 15 | 20 | 0 | 02 | 29 | 37 | 66 |
| **Total** | **16** | **28** | **05** | **02** | **15** | **25** | **22** | **22** | **45** | **52** | **07** | **03** | **110** | **128** | **238** |